**संचालक फलोत्पादन**
(कृषि आयुक्तालय)
कृषि भवन जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
**दुरध्वनी क्र.** ०२०-२५५३८०९५/२५५३७९५७ **ई-मेल-** hortplantprotection@rediffmail.com
**फॅक्स नं. ०२०-२५५३७५६५**

**मार्गदर्शक सूचना**

जा.क्र.कृआ/फलो-३/हॉर्टसॅप २०१६-१७/मा.सू./२१२१/१६
कृषि आयुक्तालय (फलोत्पादन विभाग), महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११ ००५, दिनांक- १९/०८/२०१६

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक,**
ठाणे/ पुणे / नाशिक / कोल्हापूर /
औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर

**विषय :- फलोत्पादन पिकांवरील कीड-रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) सन २०१६-१७ मार्गदर्शक सूचना....**

**संदर्भ :-** १. या कार्यालयाचे पत्र क्र. कृआ/फलो-३/हॉर्टसॅप १६-१७/प्र.मा./११५८/२०१६, दिनांक-२१/४/२०१६
२. या कार्यालयाचे पत्र क्र. कृआ/फलो-३/हॉर्टसॅप १६-१७/प्र.मा./१७०६/२०१६, दिनांक-२१/०६/२०१६
३. या कार्यालयाचे पत्र क्र. कृआ/फलो-३/हॉर्टसॅप १६-१७/प्र.मा./१७९९/२०१६, दिनांक-०८/०७/२०१६
४. या कार्यालयाचे पत्र क्र. कृआ/फलो-३/हॉर्टसॅप १६-१७/प्र.मा./२०१९/२०१६, दिनांक-०१/०८/२०१६
५. शासन निर्णय क्र. राकृवियो-२०१५/प्र.क्र.३२७/९-अे, दिनांक-११/०८/२०१६

उपरोक्त विषयानुसार सन २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या फलोत्पादन पिकावरील “कीड-रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप)” च्या अंमलबजावणीकरीता प्रशासकीय मान्यतेस्तव संदर्भ क्र. १ ते ४ अन्वये शासनास कळविण्यात आलेले होते. त्यानुसार संदर्भ क्र. ५ अन्वये सन २०१६-१७ मध्ये सदर योजनेच्या अंमलबजावणीस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्याच्या मान्यतेच्या अधिन राहून सोबत सहपत्रित केल्याप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे.

मार्गदर्शक सूचनानुसार कंत्राटी मनुष्यबळ भरतीच्या निविदा प्रक्रिया विभागीय स्तरावरुन राबविण्यात यावी. प्रकल्पाअंतर्गत कंत्राटी कर्मचा-यांच्या वेतनाचा तपशील सोबत **“प्रपत्र -ब”** मध्ये सहपत्रित करण्यात येत आहे. निविदा प्रक्रिया राबविताना त्यामध्ये सदर वेतनाचा तपशिल अंतर्भूत करावा.

सन २०१६-१७ मध्ये तालुकानिहाय कीड सर्वेक्षणासाठी आवश्यक कीड सर्वेक्षक, कृषि पर्यवेक्षक व संगणक प्रचालक यांची संख्या निर्धारीत करण्यात आलेली आहे. सुलभ संदर्भासाठी जिल्हानिहाय कीड सर्वेक्षक, संगणक प्रचालक व कृषि पर्यवेक्षक यांचा तपशिल **“प्रपत्र -अ”** मध्ये सोबत सहपत्रित केला आहे.

वरीलप्रमाणे संबंधीतांनी वेळोवेळी कार्यवाही करुन प्रत्येक महिन्याच्या १० तारखेस मासिक प्रगती अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करावा. मार्गदर्शक सूचना कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असून मार्गदर्शक सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयापर्यंत वितरीत होतील, याची कृपया दक्षता घ्यावी. याबाबत शासन

स्तरावरुन काही धोरणात्मक बदल झाल्यास तसे आपणास अवगत करण्यात येईल व सदर बदलांनुसार पुढील कार्यवाही करणे बंधनकारक राहील याची कृपया नोंद घ्यावी.

**सोबत :- मार्गदर्शक सूचना**

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११००५

**प्रत,**

१. **मा. अपर मुख्य सचिव,** कृषि व फलोत्पादन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. **संचालक,** राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र, नवी दिल्ली (एनसीआयपीएम) (भारतीय कृषि संशोधन परिषद), नवी दिल्ली.
३. **वरिष्ठ शास्त्रज्ञ,** राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, तिरुचिरापल्ली यांना माहितीस्तव.
४. **संचालक,** राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र, पुणे-सोलापूर बायपास, शेळगी रोड, सोलापूर यांना माहितीस्तव.
५. **संचालक,** राष्ट्रीय लिंबुवर्गीय संशोधन केंद्र, पो. बॉक्स नं. ४६४, शंकर नगर पोस्ट ऑफिस, नागपूर, ४४० ०१०
६. **संशोधन संचालक,** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी / डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी / मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
७. **संचालक (विस्तार शिक्षण),** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी / डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी / मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
८. **प्रमुख,** केळी संशोधन केंद्र, जळगाव
९. **प्रमुख,** फळसंशोधन केंद्र, वेंगुर्ला, जि. सिंधुदूर्ग
१०. **कनिष्ठ किटकशास्त्रज्ञ,** कृषि संशोधन केंद्र, पालघर
११. **कृषि उपसंचालक,** नियोजन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -५
१२. **कृषि उपसंचालक,** आयुक्त कृषि कक्ष, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे – १
१३. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,**
पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, हिंगोली, नांदेड, बुलढाणा, अकोला, अमरावती, नागपूर व वर्धा

# Horticulture Crop Pest Surveillance, Advisory and Management Project (HORTSAP) – 2016-17

# Guidelines

---

# राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत फळपिकांवरील कीड-रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प – २०१६-१७

# मार्गदर्शक सूचना

-----ooooo-----

**१. प्रस्तावना :-** फलोत्पादन विभागामार्फत आंबा, डाळींब व केळी या पिकांवरील किड/रोगाच्या सर्वेक्षण व व्यवस्थापनासाठी किडरोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २०११-१२ पासून राबविण्यात येत आहे. सन २०१४-१५ मध्ये सदर योजनेअंतर्गत आंबा, डाळिंब, केळी या पिकांमध्ये नवीन जिल्ह्यांचा समावेश केला असून संत्रा, मोसंबी व चिक्कू या नवीन फळपिकांचा समावेश करण्यात आलेला आहे. सन २०१५-१६ मध्ये सदर योजना २३ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आलेली आहे. त्याचधर्तीवर सन २०१६-१७ मध्ये ही सदर योजना राबविण्यात येणार आहे.

**२. योजनेचा उद्देश :-**

२.१ आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, चिकू या पिकांचे सर्वेक्षण करून हंगामनिहाय किडरोगांच्या प्रादुर्भावाबाबत शेतक-यांना वेळीच उपाय योजना सुचविणे.

२.२ किडरोगांच्या आकस्मिक प्रादुर्भावामुळे शेतक-यांचे होणारे नुकसान टाळणे.

२.३ किडरोगांचा प्रादुर्भाव वेळीच लक्षात आल्याने पुढील संभाव्य नुकसान टाळून उत्पादनात वाढ करणे.

२.४ किडरोगांबाबत शेतक-यांना प्रशिक्षीत करुन किडरोगांचे वेळीच व्यवस्थापन करणे.

२.५ किडरोग प्रादुर्भावीत क्षेत्रासाठी आपत्कालीन परिस्थितीत पीक संरक्षण औषधे उपलब्ध करुन देणे.

२.६ वारंवार येणा-या किडरोगांबाबत सांख्यीकी माहिती संकलीत करणे व कायम स्वरुपाच्या व्यवस्थापनाबाबत कृषि विद्यापीठांच्या सहाय्याने शिफारशी निश्चित करणे.

२.७ राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र (भारतीय कृषि संशोधन परिषद) नवी दिल्ली, राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र, सोलापूर, राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, तिरुचिरापल्ली, राष्ट्रीय लिंबुवर्गीय संशोधन केंद्र, नागपूर, केळी संशोधन केंद्र, जळगाव, चिक्कू संशोधन केंद्र, पालघर, फळसंशोधन केंद्र, वेंगुर्ला इत्यादी संस्था, राज्यातील चारही कृषि विद्यापीठे व राज्याचा कृषि विभाग यांच्या मदतीने आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, चिकू या पिकांवरील कीड रोगांचे सर्वेक्षण करून शेतक-यांना उपाययोजना सुचविणे, कीड रोग व्यवस्थापनाबाबतच्या शिफारशी तयार करणे आणि त्यानुषंगाने कृषि खात्यातील कर्मचारी व शेतकरी यांना प्रशिक्षण देणे.

**३. योजनेचे कार्यक्षेत्र :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू ही मुख्य फळपिके लागवडीखाली आहेत. त्यानुसार आंबा फळपिकाखाली पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, बीड, उस्मानाबाद, औरंगाबाद या जिल्ह्यात ८६,२७६ हेक्टर क्षेत्र, डाळींब पिकाखाली नाशिक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सांगली, सातारा, औरंगाबाद व धुळे या जिल्ह्यात ८७,९८१ हेक्टर क्षेत्र, केळी पिकाखाली जळगाव, अकोला, सोलापूर, हिंगोली, नांदेड जिल्ह्यात २७,४६० हेक्टर क्षेत्र, संत्रा पिकाखाली अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा, नागपूर जिल्ह्यात ७९,३४८ हेक्टर क्षेत्र, मोसंबी पिकाखाली औरंगाबाद, जालना जिल्ह्यात ३१,८२३ हेक्टर क्षेत्र आणि चिकू फळपिकाखाली पालघर या जिल्ह्यांत २,२१६ हेक्टर क्षेत्र असे एकूण **२३** जिल्ह्यातील **३,१५,१०४** हेक्टर क्षेत्रावर हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

सदर फळपिकांवर मागील काही वर्षातील कीड रोगांचा प्रादुर्भाव लक्षात घेवून हा प्रकल्प राबविण्यासाठी २३ जिल्हयांची फळपिकाखालील क्षेत्रानुसार निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पात आंबा पिकाकरीता तुडतुडे, फुलकिडे, फळमाशी, भूरी, करपा, डाळींब पिकाकरीता ऑईली स्पॉट (तेलकट डाग), मर, शॉट होल बोअरर, फळे पोखरणारी अळी, फुलकिडे, केळी पिकाकरीता सिगाटोका (करपा), संत्रा व मोसंबी पिकासाठी काळी पांढरी माशी, सायला, लिफ माईनार, फायटोप्थोरा त्याचप्रमाणे चिकू फळपिकासाठी बी-पोखरणारी अळी, फळे पोखरणारी अळी, फळगळ या किड / रोगांवर मुख्य भर देण्यात आला आहे. सन २०१६-१७ मध्ये राबविण्यात येणा-या कीड रोग सर्वेक्षण, व्यवस्थापन व सनियंत्रण प्रकल्पामध्ये तालुकानिहाय कीड सर्वेक्षणासाठी आवश्यक कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट), कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर) व संगणक प्रचालक (डेटा एंन्ट्री ऑपरेटर) यांची संख्या निर्धारीत करण्यात आलेली आहे. त्याची माहिती सोबत **"प्रपत्र-अ"** मध्ये देण्यात आलेली आहे.

तथापि एकूण संख्येच्या अधिन राहून विभागीय कृषि सहसंचालक यांनी जिल्हानिहाय फळपिकाच्या क्षेत्रानुसार कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट) यांचे कार्यक्षेत्र ठरवावे. विभागीय कृषि सहसंचालक / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी योजना राबविण्यासाठी पिकनिहाय व तालुकानिहाय समूह ठरवून सर्वसाधारणपणे आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांकरीता कमीत कमी ५०० व जास्तीत जास्त २००० हेक्टरसाठी १ किड सर्वेक्षक असे गृहीत धरुन नियुक्ती करावी. ज्याठिकाणी एकापेक्षा जास्त पिके योजनेंतर्गत घ्यावयाची आहेत त्यामध्ये दोन पिकासाठी एक किड सर्वेक्षक नियुक्त करावा.

## ४. कार्यपध्दती :-

सदर कार्यक्रमात खालील बाबींवर भर द्यावयाचा आहे.

४.१ कीड-रोगांचे सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन पध्दती.

४.२ शेतक-यांमध्ये कीड-रोगांबाबत जागरुकता निर्माण करणे.

४.३ आपत्कालीन परिस्थितीत कीड - रोगांच्या व्यवस्थापनासाठी पीक संरक्षण औषधांचा पुरवठा करणे.

राज्यपातळीवर आयुक्त (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती (स्टिअरिंग कमिटी) या प्रकल्पाच्या संपूर्ण नियोजन व सनियंत्रणासाठी स्थापन करण्यात आली असून यामध्ये विविध केंद्र व राज्य शासनाच्या कृषि संशोधन व विस्तार क्षेत्रातील संस्थांचा सहभाग आहे. राज्यस्तरीय सुकाणू समिती (स्टिअरिंग कमिटी) खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र | सहभागी संस्था | प्रतिनिधी | पद |
|---|---|---|---|
| १ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. विकास देशमुख (भाप्रसे),<br>आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र, नवी दिल्ली (एनसीआयपीएम) (भारतीय कृषि संशोधन परिषद), नवी दिल्ली. | डॉ. देशबंधु अहुजा<br>संचालक, एनसीआयपीएम, नवी दिल्ली | सहअध्यक्ष |
| ३ | कृषि विभाग, महाराष्ट्र शासन | श्री. प्र. श. शेटे,<br>उपसचिव, फलोत्पादन,<br>कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. एम. एस. घोलप<br>संचालक फलोत्पादन<br>कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ५ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. के. व्ही. देशमुख<br>संचालक, विस्तार व प्रशिक्षण<br>कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ६ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. के. व्ही. देशमुख<br>संचालक, निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण,<br>कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |

| अ.क्र | सहभागी संस्था | प्रतिनिधी | पद |
|---|---|---|---|
| ७ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. प्र. ना. पोकळे,<br>संचालक, प्रकिया व नियोजन,<br>कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ८ | राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र, सोलापूर (डाळींब) | डॉ. आर. के. पाल,<br>संचालक, राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र, सोलापूर | सदस्य |
| ९ | राष्ट्रीय लिंबुवर्गीय संशोधन केंद्र, नागपूर | एम. एस. लदानिया<br>संचालक, राष्ट्रीय लिंबुवर्गीय संशोधन केंद्र, नागपूर | सदस्य |
| १० | भारतीय केळी संशोधन केंद्र, तिरुचिरापल्ली (केळी) | डॉ. आर.थंगवेल्लू,<br>वरिष्ठ संशोधक, वनस्पती रोगशास्त्र,<br>भारतीय केळी संशोधन केंद्र, तिरुचिरापल्ली | सदस्य |
| ११ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी | डॉ. एस. एस. जाधव<br>विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग,<br>महात्मा फुले कृषि विदयापीठ,<br>राहूरी, जि. अहमदनगर | सदस्य |
| १२ | महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहूरी | डॉ. एस. जी. बोरकर<br>विभाग प्रमुख, वनस्पती रोगशास्त्र विभाग,<br>महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहूरी,<br>जि. अहमदनगर | सदस्य |
| १३ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | डॉ. ए. एल. नरंगलकर<br>विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग,<br>डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | सदस्य |
| १४ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | डॉ. व्ही. एस. पांडे<br>विभाग प्रमुख, वनस्पती रोगशास्त्र विभाग,<br>डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | सदस्य |
| १५ | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | डॉ. डी. डी. उंदीरवाडे<br>विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग,<br>डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | सदस्य |
| १६ | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | डॉ. एस. एस. माने<br>विभाग प्रमुख, वनस्पती रोगशास्त्र विभाग,<br>डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | सदस्य |
| १७ | मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | डॉ. बी. बी. भोसले<br>विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग,<br>मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | सदस्य |
| १८ | मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | डॉ. डी. एल. ध्रुतराज<br>विभाग प्रमुख, वनस्पती रोगशास्त्र विभाग,<br>मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | सदस्य |
| १९ | फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला (आंबा) | डॉ. पुष्पा पाटील<br>वनस्पती रोगशास्त्रज्ञ,<br>फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला, जि. सिंधुदूर्ग | सदस्य |

| अ.क्र | सहभागी संस्था | प्रतिनिधी | पद |
|---|---|---|---|
| २० | संशोधन केंद्र, पालघर<br>(चिकू) | श्री. अंकुर ढाणे<br>कनिष्ठ किटकशास्त्रज्ञ,<br>कृषि संशोधन केंद्र, पालघर | सदस्य |
| २१ | केळी संशोधन केंद्र जळगाव | डॉ. एन. बी. शेख,<br>उद्यानविद्यावेत्ता,<br>केळी संशोधन केंद्र जळगाव | सदस्य |
| २२ | राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र, नवी दिल्ली | डॉ. देशबंधु आहुजा<br>प्रमुख शास्त्रज्ञ, एनसीआयपीएम,<br>नवी दिल्ली | सदस्य |
| २३ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. उदय देशमुख<br>कृषि सहसंचालक, फलोत्पादन,<br>कृषि आयुक्तालय, पुणे – ५ | तांत्रीक समन्वयक तथा सदस्य |
| २४ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. ए. एल. लोखंडे<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>कोकण विभाग, ठाणे | सदस्य |
| २५ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. व्ही. बी. इंगळे<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>पुणे विभाग, पुणे | सदस्य |
| २६ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. के. पी. मोते<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>नाशिक विभाग, नाशिक | सदस्य |
| २७ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. एन.टी. शिसोदीया<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | सदस्य |
| २८ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. रमेश भताणे<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | सदस्य |
| २९ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | डॉ. ए. एच. किरनळी<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>लातूर विभाग, लातूर | सदस्य |
| ३० | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. एस. आर. सरदार<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>अमरावती विभाग, अमरावती | सदस्य |
| ३१ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. व्ही. एन. घावटे<br>विभागीय कृषि सहसंचालक,<br>नागपूर विभाग, नागपूर | सदस्य |
| ३२ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. के. टी. शिंदे<br>कृषि उपसंचालक, (प्रकल्प),<br>कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ३३ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. आनंद आरेकर<br>कृषि उपसंचालक, (माहिती)<br>कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ३४ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | श्री. विजयकुमार राऊत,<br>कृषि उपसंचालक, फलो-३<br>कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य<br>सचिव |

**५. संस्थानिहाय जबाबदा-या :-**

वरील संस्थांमधून प्रत्येकी एका प्रतिनिधीची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर सदस्यांनी त्यांना सोपवून दिलेल्या पुढीलप्रमाणे जबाबदा-या / कर्तव्य पार पाडणे अपेक्षीत आहे.

५.१ **राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र, भारतीय कृषि संशोधन परिषद, नवी दिल्ली**

५.१.१ ऑनलाईन माहीती भरण्यासाठी संगणक प्रणाली तयार करणे व त्याचे व्यवस्थापन करणे.

५.१.२ जीआयएस प्रणाली तयार करणे व त्याचे व्यवस्थापन करणे.

५.१.३ जी.आय.एस. आधारीत कीड रोगांचे स्वयंचलित नकाशे प्रणालीचे व्यवस्थापन करणे.

५.१.४ ऑनलाईन डेटा भरण्यासाठी सर्वेक्षण प्रपत्रे छपाई करणे व वितरीत करणे.

५.१.५ कीड रोग संरक्षण व सल्ला बाबतचे ऑनलाईन यंत्रणेचे व्यवस्थापन करणे, कीड / रोगांबाबत शास्त्रीय सल्ला देणे.

५.१.६ कीड रोग सर्वेक्षण व सल्ला चमुला सर्वेक्षण कीटचा पुरवठा करणे.

५.१.७ कीड रोग सर्वेक्षण व सल्ला चमुला तांत्रिक बाबीकरीता प्रशिक्षण व मदत करणे.

५.१.८ संपुर्ण प्रकल्पाचे तांत्रिक सनियंत्रण करणे.

५.२ **राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, तिरुचिरापल्ली / केळी संशोधन केंद्र, जळगाव**

५.२.१ केळी पिकासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दती तयार करणे, सल्ला देणे.

५.२.२ भविष्यात उदभवणा-या किडरोगांवर संशोधन करण्यासाठी माहिती संकलीत करणे व एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दती तयार करण्यासाठी शेतक-यांकडून माहीती घेणे.

५.२.३ किडरोग सर्वेक्षण व सल्ला कामामध्ये वेळच्या वेळी संनियंत्रण करुन योग्य ते मार्गदर्शन करणे.

५.२.४ किड रोगाचे तिव्रतेचे संनियत्रण ऑनलाईन अहवालावरून करणे व आपत्कालीन परिस्थितीत क्षेत्रीय भेटी देऊन उपाययोजना सुचविणे.

५.२.५ प्रकल्पातील केळी पिकाचे सर्वेक्षण, उपाययोजना व संशोधनात्मक बाबींवर अहवाल देणे.

५.३ **राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र, सोलापूर**

५.३.१ डाळींब पिकासाठी एकात्मीक किड व्यवस्थापनावर आधारीत पीक संरक्षण पध्दती तयार करणे, सल्ला देणे.

५.३.२ भविष्यात उदभवणा-या किडरोगांवर संशोधन करण्यासाठी माहिती संकलीत करणे व एकात्मीक किड व्यवस्थापन पध्दती तयार करण्यासाठी शेतक-यांकडून माहीती घेणे.

५.३.३ किडरोग सर्वेक्षण व सल्ला कामामध्ये वेळच्या वेळी संनियंत्रण करुन योग्य ते मार्गदर्शन करणे.

५.३.४ किड रोगाचे तिव्रतेचे संनियंत्रण ऑनलाईन अहवालावरून करणे व आपत्कालीन परिस्थितीत क्षेत्रीय भेटी देऊन उपाययोजना सुचविणे.

५.३.५ प्रकल्पातील डाळींब पिकाचे सर्वेक्षण, उपाययोजना व संशोधनात्मक बाबी यावर अहवाल देणे.

५.४ **राष्ट्रीय लिंबुवर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूर**

५.४.१ संत्रा / मोसंबी पिकांसाठी एकात्मीक किड व्यवस्थापनावर आधारीत पीक संरक्षण पध्दती तयार करणे, सल्ला देणे.

५.४.२ किडरोग सर्वेक्षण व सल्ला कामामध्ये वेळच्या वेळी संनियंत्रण करुन योग्य ते मार्गदर्शन करणे.

५.४.३ किड रोगाचे तिव्रतेचे संनियंत्रण ऑनलाईन अहवालावरून करणे व आपत्कालीन परिस्थितीत क्षेत्रीय भेटी देऊन उपाययोजना सुचविणे.

५.४.४ प्रकल्पामधील संत्रा / मोसंबी पिकांचे सर्वेक्षण, उपाययोजना व संशोधनात्मक बाबी यावर अहवाल देणे.

## ५.५ कृषि विभाग

५.५.१ कीड सर्वेक्षणासाठी योग्य कृषि पर्यवेक्षकांची नावे निश्चीत करून त्यांची उपलब्धता करुन घेणे, तसेच कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट), संगणक प्रचालक (डेटा ऍन्ट्री ऑपरेटर) संगणक प्रणाली मदतनीस, संगणक चालक व लेखापाल यांच्या सेवा पुरवठादार संस्थांकडून (Placement Agencies) नेमणुका करुन घेणे व अनुषंगिक जबाबदा-या पार पाडणे.

५.५.२ कृषि विभागातील कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे.

५.५.३ एकात्मिक कीड व्यवस्थापनावर आधारीत कीड व्यवस्थापन पध्दतीचे शेतक-यांना प्रशिक्षण देणे.

५.५.४ एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दतीचा एसएमएस यंत्रणा, भित्तीपत्रके, घडीपत्रीका, आकाशवाणी, दुरदर्शन, वृत्तपत्र व इतर प्रसारमाध्यमांद्वारे प्रचार व प्रसार करणे.

५.५.५ गावनिहाय किडरोगाची तिव्रता उपविभागस्तरावरुन तपासणे व त्याची माहीती ऑनलाईन उपलब्ध करुन देणे.

५.५.६ आपत्कालीन परिस्थितीत किडरोग सर्वेक्षण व सल्ला याव्दारे किडरोगांबाबत शेतक-यांना एसएमएसद्वारे संदेश देणे.

५.५.७ शेतक-यांमध्ये जनजागृती करुन कीड/रोग व्यवस्थापनासाठी उपाययोजना करणे.

५.५.८ आपत्कालीन परिस्थितीत कीड रोगांच्या व्यवस्थापनासाठी ५० टक्के अनुदानावर पीक संरक्षण औषधांचा/साहित्याचा पुरवठा करणे, अन्य योजनांमध्ये पिक संरक्षण बाबींचे अनुदान सर्वेक्षणाधारीत किडरोगांचे तिव्रतेप्रमाणे शेतक-यांना उपलब्ध करून देणे.

## ५.६ कृषि विद्यापीठे

- ✓ **महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी**
- ✓ **डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**
- ✓ **वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**
- ✓ **डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**

५.६.१ जिल्हानिहाय कृषि विभागातील मास्टर ट्रेनर्स, कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट), कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर) व संगणक प्रचालक (डेटा एंट्री ऑपरेटर) यांना प्रशिक्षण देणे

५.६.२ जिल्हानिहाय किडरोग सर्वेक्षणांचेबाबत कृषि विद्यापीठाचे जिल्हा समन्वयकामार्फत संपर्क ठेवून आढावा घेणे. जिल्हा समन्वयकांनी त्यांना उपलब्ध करून दिलेल्या अनुदानातून जिल्ह्यामध्ये क्षेत्रीय भेटी देऊन प्रकल्पाच्या कामाचा तांत्रिक आढावा घेणे व त्यानुसार विद्यापीठ आणि कृषि विभाग यांना अहवाल देणे.

५.६.३ कीडरोग सर्वेक्षण व एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दतीच्या कामात तांत्रिक मदत करणे

५.६.४ कृषि विद्यापीठाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या संशोधन सहयोगी यांच्या मदतीने तालुकानिहाय ऑनलाईन वेबसाईटवर भरण्यात आलेल्या किडरोग सर्वेक्षण अहवालावर आधारीत माहितीचे विश्लेषण करणे व किडरोगाचे तालुकानिहाय एसएमएससाठी तसेच जाहीर निवेदनासाठी सल्ला व उपाययोजना, ऑनलाईन वेबसाईटवर आठवडयातून दोनदा (दर सोमवार व गुरुवार) उपलब्ध करुन देणे.

५.६.५ कृषि विद्यापीठ कार्यक्षेत्रातील किडरोगाचे तीव्रतेवर लक्ष ठेवून तीव्रता वाढणा-या व वाढलेल्या ठिकाणी भेटी देऊन उपाययोजना सुचविणे व अहवाल कृषि आयुक्तालयास देणे.

५.६.६ कृषि विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कृषि विज्ञान केंद्राच्या सेवा या प्रकल्पासाठी उपलब्ध करून घेणे, त्यांचा सहभाग वाढवून शेतक-यांना संपर्क व मार्गदर्शन करणे.

५.७ **विभागीय फळसंशोधन, केंद्र वेंगुर्ला**

५.७.१ आंबा पिकासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दती तयार करणे, सल्ला देणे.

५.७.२ भविष्यात उदभवणा-या किडरोगांवर संशोधन करण्यासाठी माहिती संकलीत करणे व एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दती तयार करण्यासाठी शेतक-यांकडून माहीती घेणे.

५.७.३ किडरोग सर्वेक्षण व सल्ला कामामध्ये वेळच्या वेळी संनियंत्रण करुन योग्य ते मार्गदर्शन करणे.

५.७.४ किड रोगाचे तिव्रतेचे संनियत्रण ऑनलाईन अहवालावरून करणे व आपत्कालीन परिस्थितीत क्षेत्रीय भेटी देऊन उपाययोजना सुचविणे.

५.७.५ प्रकल्पातील आंबा पिकाचे सर्वेक्षण, उपाययोजना व संशोधनात्मक बाबीवर अहवाल देणे.

५.७.६ आंबा पिकावरील फळमाशी नियंत्रणाकरीता खास मोहिम राबविणे.

५.७.७ कोकण विभाग आंबा पिकावरील फळमाशीमुक्त घोषित करण्याकरीता कार्यवाही करणे.

५.८ **कृषि संशोधन केंद्र, पालघर**

५.८.१ चिकू पिकासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दती तयार करणे, सल्ला देणे.

५.८.२ भविष्यात उदभवणा-या किडरोगांवर संशोधन करण्यासाठी माहिती संकलीत करणे व एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दती तयार करण्यासाठी शेतक-यांकडून माहीती घेणे.

५.८.३ किडरोग सर्वेक्षण व सल्ला कामामध्ये वेळच्या वेळी संनियंत्रण करुन योग्य ते मार्गदर्शन करणे.

५.८.४ किड/रोगांच्या तिव्रतेचे संनियत्रण ऑनलाईन अहवालावरून करणे व आपत्कालीन परिस्थितीत क्षेत्रीय भेटी देऊन उपाययोजना सुचविणे.

५.८.५ प्रकल्पातील चिकू पिकाचे सर्वेक्षण, उपाययोजना व संशोधनात्मक बाबीवर अहवाल देणे.

५.९ **कृषि विज्ञान केंद्र**

५.९.१ कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांमार्फत योग्य प्रकारे सर्वेक्षण होण्यासाठी त्यांचेवर देखरेख ठेवणे.

५.९.२ आठवडयातील दोन दिवसांत प्रत्येक जिल्हयातील कार्यरत कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक मुख्यालयी हजर असलेबाबत खात्री करणे.

५.९.३ कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांचेकडून कीड रोग सर्वेक्षणाचे काम तांत्रिक दृष्ट्या योग्य प्रकारे होत असल्याबाबतची खात्री करणे.

५.९.४ कीड रोग सर्वेक्षणाबाबत कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांना मार्गदर्शन करणे.

५.९.५ कीड रोग सर्वेक्षणाबाबत कृषि विभागाच्या क्रॉपसॅपप्रमाणे विहीत प्रपत्रातील अहवाल फलोत्पादन विभागास सादर करणे.

## ६ सर्वेक्षण कार्यपध्दती :-

आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, चिकू या पिकांसाठी राज्याच्या २३ जिल्हयातील कृषि विभागाच्या एकूण ४९ उपविभांगात सुमारे २१५ कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट) सोमवार, मंगळवार, गुरुवार, शुक्रवार या दिवशी किडरोगांच्या विविध अवस्थांची सापळे व अन्य साधनांच्या मदतीने क्षेत्रियभेटी देऊन निरीक्षणे नोंदवतील. ही नोंदवलेली निरिक्षणे दर बुधवारी व शनिवारी ४९ कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर), ४९ संगणक प्रचालक(डेटा एंट्री ऑपरेटर) यांच्या मदतीने संगणक प्रणाली मध्ये ऑनलाईन वेबसाईटवर भरण्यात येतील. वेबसाईटवरील या निरिक्षणांचे विश्लेषण राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र (भारतीय कृषि संशोधन परिषद), नवी दिल्ली यांचे मार्गदर्शनाखाली करून राज्यातील संबधीत कृषि विद्यापीठांचे शास्त्रज्ञ वेबसाईटवर ऑनलाईन तालुकानिहाय उपाय योजना सुचवतील. या उपाययोजनांच्या आधारे शेतक-यांना दुरदर्शन, आकाशवाणी, एसएमएस, वृत्तपत्रे इत्यादी प्रसिध्दी माध्यमांव्दारे मार्गदर्शन केले जाईल. या मार्गदर्शनानुसार शेतक-यांना वेळच्या वेळी उपाययोजना करुन कीड रोग नियंत्रण करता येईल.

सदर प्रकल्पात आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांकरीता कमीत कमी ५०० व जास्तीत जास्त २००० हेक्टरसाठी १ किड सर्वेक्षक याप्रमाणे पिकांच्या सर्वेक्षणासाठी कीड सर्वेक्षकांची नेमणूक करावी.

वरीलप्रमाणे नियुक्त दहा कीड सर्वेक्षकांचे (पेस्ट स्काऊट) सनियंत्रण एका कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर) यांचेमार्फत करावयाचे आहे. तसेच नेमून दिलेल्या क्षेत्रापैकी काही गांवे रॅन्डम पध्दतीने सर्वेक्षणाकरीता निश्चित

करुन कृषि पर्यवेक्षकामार्फत रॅन्डम पध्दतीने सर्वेक्षण करावयाचे आहे. याबाबत सविस्तर माहिती प्रशिक्षणामध्ये संबंधितांना देण्यात येईल. एकूण संख्येच्या अधिन राहून विभागीय कृषि सहसंचालकांनी फळपिकाखालील क्षेत्रानुसार कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट) यांचे कार्यक्षेत्र ठरवावे व त्याप्रमाणे नेमणूका कराव्यात.

**६.१ पिकनिहाय सर्वेक्षण करावयाचे कीड/रोगः-**

या प्रकल्पात पुढीलप्रमाणे कीड रोगांचे सर्वेक्षण व सनियंत्रण करावयाचे आहे

**आंबा** : तुडतुडे, भूरी, फुलकिडे, फळमाशी (सापळ्यासहीत), करपा

**डाळींब** : तेलकट डाग, मर, फळे पोखरणारी अळी, फुलकिडे, शॉट होल बोअरर

**केळी** : सिगाटोका (करपा)

**संत्रा व मोसंबी** : काळी/पांढरी माशी, सायला, लिफ माईनार, फायटोप्थोरा

**चिकू** : बी-पोखरणारी अळी, फळे पोखरणारी अळी, फळगळ

**६.२ सर्वेक्षणासाठी पिकनिहाय कालावधी-**

| **अ.क्र.** | **पीक** | **सर्वेक्षणाचा कालावधी** |
|---|---|---|
| १ | आंबा | १५ नोव्हेंबर २०१६ ते ३१ मे २०१७ |
| २ | डाळींब | १५ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ |
| ३ | केळी | १५ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ |
| ४ | संत्रा | १५ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ |
| ५ | मोसंबी | १५ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ |
| ६ | चिकू | १५ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ |

**६.३ कीड सर्वेक्षकांसाठी गाव व सर्वेक्षण क्षेत्राची निवडः-**

६.३.१ **आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू :-**

६.३.१.१ गाव निवडीकरिता प्रत्येक तालुक्यातील आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू पिकाखालील गावनिहाय क्षेत्र निश्चित करण्यात यावे.

६.३.१.२ ज्याठिकाणी आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू पिकांचे सर्वेक्षण होणार असेल त्याठिकाणी सदर पिकांखालील कमीत कमी ५०० व जास्तीत जास्त २००० हेक्टरप्रमाणे गावांचे गट समूह पध्दतीने तयार करण्यात यावेत व प्रत्येक कीड सर्वेक्षकाला सदर क्षेत्र सर्वेक्षणाकरिता नेमून द्यावे.

६.३.१.३ वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या गावांच्या गटातील आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू पिकाखालील जास्तीत जास्त क्षेत्र असणा-या ८ गावांची अथवा गावांच्या गटांची निवड करण्यात यावी. याकरीता सर्वसाधारणपणे आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, चिकू पिकाचे २५० हेक्टर क्षेत्र असणारे गाव अथवा गावांचा गट यामध्ये सदर २००० हेक्टरची विभागणी करण्यात यावी.

६.३.१.४ २५० हेक्टर क्षेत्र असणा-या गावामधून अथवा गावांच्या गटामधून चार निश्चित व चार रॅन्डम प्लॉटची सर्वेक्षणाकरिता निवड करण्यात यावी. जर एकाच गावात २००० हेक्टर क्षेत्र असल्यास अशा वेळी आठ निश्चित व आठ रॅन्डम प्लॉटची सदर गावामधून निवड करण्यात यावी व त्या संबंधीत एकाच गावात कीड सर्वेक्षक संपूर्ण दिवस सर्वेक्षण करेल. याच पध्दतीने प्रति ५०० ते २००० हेक्टर क्षेत्राचे गाव अथवा गावांच्या गटामधून चार निश्चित व चार रॅन्डम प्लॉटची निवड करण्यात यावी. ज्यावेळी गावांमधील क्षेत्र २००० हेक्टर पर्यंत नसेल अशा वेळी जास्तीत जास्त क्षेत्र असणारी गावे विचारात घ्यावीत. **गावांची निवड करताना निवडलेली गावे सदर गटाचे प्रतिनिधीत्व करतील याची**

**काळजी घ्यावी.**ज्या तालुक्यांमध्ये आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू पिकाखालील क्षेत्र अत्यंत कमी असेल अशावेळी कीड सर्वेक्षकाने फक्त धावते सर्वेक्षण (Roving Survey) करावे.

- ✓ कीड सर्वेक्षकाने एकमेकांच्या विरुध्द दिशेला असणा-या निश्चित प्लॉटची निवड करावी तसेच त्यांचे अक्षांश व रेखांशाची अहवालात नोंद करावी.
- ✓ कीड सर्वेक्षकाने निश्चित प्लॉटच्या विरुध्द दिशेकडील प्लॉटची रॅन्डम प्लॉट म्हणून निवड करावी. कीड सर्वेक्षकाने रॅन्डम प्लॉटची निवड कोणत्याही विशिष्ट हेतूने न करता पूर्णतः रॅन्डम पध्दतीने करावी.
- ✓ प्रत्येक कीड सर्वेक्षकाने आठवडयातील प्रत्येक सोमवार, मंगळवार व गुरुवार, शुक्रवार दोन गावे प्रति दिन असे एकूण प्रति आठवडा ८ गावांचे सर्वेक्षण करावे.
- ✓ कीड सर्वेक्षक, सर्वेक्षण करावयाच्या प्रत्येक दिवशी प्रत्येक गावात चार निश्चित व चार रॅन्डमचे प्लॉटचे सर्वेक्षण करेल.

### ६.४ कृषि पर्यवेक्षकांसाठी गाव व सर्वेक्षण क्षेत्राची निवडः-

६.४.१ कीड सर्वेक्षकाने सर्वेक्षण करावयाच्या निश्चित प्लॉटच्या अक्षांश व रेखांशाची कृषि पर्यवेक्षकाने जीपीएस उपकरणाद्वारे वाचने घेऊन सदर नोंद कीड सर्वेक्षकाच्या सर्वेक्षण प्रपत्रात नोंद होईल असे पहावे.

६.४.२ प्रत्येक तालुक्यामधील जी गावे कीड सर्वेक्षकांमार्फत कीड रोग सर्वेक्षणासाठी निवडण्यात आली नाहीत त्यांची यादी करण्यात यावी आणि अशा गावांचे कृषि पर्यवेक्षकामार्फत धावते सर्वेक्षण (Roving Survey) करण्यात यावे.

६.४.३ कृषि पर्यवेक्षकाने चार वेगवेगळया मार्गावर गोलाकार सर्वेक्षण दौ-याचा कार्यक्रम (साधारण १०० ते १५० कि.मी.) तयार करावा. यासाठी कीड सर्वेक्षकाकडून सर्वेक्षण न झालेले दूरचे/दुर्गम क्षेत्र विचारात घेणेत यावे. तसेच सदर दौ-यासाठीचा मार्ग ठरविताना त्याच्याकडील संपूर्ण कार्यक्षेत्राचे चार सर्वेक्षण मार्गामध्ये अंतर्भाव होईल याची काळजी घ्यावी.

६.४.४ कृषि पर्यवेक्षकाने वरील मार्गावरच सोमवार, मंगळवार, गुरुवार व शुक्रवारी धावते सर्वेक्षण करावे.

६.४.५ वरील चार दिवसांच्या कार्यक्रमातील प्रत्येक दिवशी कृषि पर्यवेक्षक ५ ते ७ प्लॉटचे निश्चित कीडींसाठी संख्यात्मक सर्वेक्षण तर इतर सर्व कीडींसाठी गुणात्मक सर्वेक्षण करेल (५ ते ८ गावांमधील). त्याचबरोबर सदर मार्गावरील कीड सर्वेक्षकांच्या (१ ते २ कीड सर्वेक्षक) प्लॉटमधील उपस्थितीबाबत/कार्यरत असल्याबाबत खात्री करेल.

६.४.६ सदर सर्वेक्षण दौ-याचा कार्यक्रम (चार मार्ग), सर्वेक्षण प्रपत्रे, भेट दिलेल्या कीड सर्वेक्षकांची संख्या याबाबतचा सविस्तर तपशिल प्रत्येक कृषि पर्यवेक्षकाने अद्ययावत ठेवावा.

६.४.७ कृषि पर्यवेक्षकाने त्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व कीड सर्वेक्षकांचे भ्रमणध्वनी क्रमांक, त्यांच्या प्रत्येक दिवसाचा कार्यक्रम, ते भेट देणार असलेल्या गावांची यादी स्वतःजवळ ठेवावी. सदर यादी उपविभागीय कृषि अधिकारी व कृषि विज्ञान केंद्रांना उपलब्ध करुन द्यावी जेणेकरुन त्यांचे अचानक भेटीद्वारे (Surprise Visits) त्यांना या कार्यक्रमाचे सनियंत्रण करता येईल.

६.४.८ धावते सर्वेक्षणादरम्यान सर्वेक्षणाचे क्षेत्र निवडताना कीड रोगाच्या अचानक प्रादूर्भावाबाबत (असल्यास) शेतक-यांकडील मिळालेल्या माहितीचा विचार करावा.

## ७ प्रशिक्षण कार्यक्रम :-

### ७.१ कृषि पर्यवेक्षक व कीड सर्वेक्षक यांना सर्वेक्षणाचे प्रशिक्षण

किडरोगाचे सर्वेक्षण, त्याच्या पध्दती, किडरोगांची ओळख, त्यांचा जीवनक्रम, हवामानावर आधारीत कीड रोगांचा प्रादुर्भाव तसेच किडरोगनिहाय उपाययोजना याबाबतचे संबंधीत कृषि विद्यापीठात प्रशिक्षण आयोजीत करावयाचे आहे. सर्वेक्षणासाठी निवड केलेल्या कृषि पर्यवेक्षक व कीड सर्वेक्षक यांना हंगाम सुरु होण्यापूर्वी आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांसाठी दोन दिवस कीड रोग सर्वेक्षणाचे प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षण कार्यक्रम खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | पिक | जिल्हा | प्रशिक्षणाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | आंबा | पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, बीड, उस्मानाबाद, औरंगाबाद | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली |
| २ | डाळींब | नाशिक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सांगली, सातारा, औरंगाबाद, धुळे | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी |
| ३ | केळी | जळगाव, अकोला, सोलापूर, हिंगोली | केळी संशोधन केंद्र, जळगाव |
| ४ | संत्रा | अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा, नागपूर | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला |
| ५ | मोसंबी | औरंगाबाद, जालना | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ६ | चिकू | पालघर | चिक्कू संशोधन केंद्र, पालघर |

प्रशिक्षणासाठीचा खर्च प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती) अंतर्गत मान्य प्रमाणकांनुसार खर्च करावा.

**(रु. ३५०/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिन याप्रमाणे दोन दिवसांकरीता एकूण रु. ७००/-)**

### ७.२ जनजागरण प्रशिक्षण

शेतक-यांमध्ये जागरुकता निर्माण करण्याकरीता क्षेत्रीय पातळीवरील अधिकारी व कर्मचा-यांना अद्ययावत कीड व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात यावे. या करीता कृषि विभागाचे उपविभागीय कृषि अधिकारी व प्रति जिल्हा दहा मास्टर ट्रेनर्स तसेच जिल्हा पातळीवरील कृषि विद्यापीठाचे समन्वयक यांचेसाठी हंगामापूर्वी दोन दिवसाचे प्रशिक्षण संबंधित कृषि विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात यावे. या मास्टर ट्रेनर्सव्दारे कृषि विभागातील जिल्ह्यांमधील सर्व तांत्रिक अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षित करण्यात यावेत. अशा प्रकारे प्रशिक्षण घेतलेल्या अधिकारी/कर्मचा-यांकडून संबंधित तालुक्यातील प्रत्येक गावातील पाच प्रगतशिल शेतक-यांची कीड-रोग उपाय योजनांबाबत एसएमएसद्वारे माहिती देण्याकरिता निवड करावी व निवडलेल्या शेतक-यांना कीड व रोगांचे एकात्मिक कीड नियंत्रण कसे करावे मित्रकिटक, शत्रुकिडींची ओळख याबाबत गांवपातळीवर माहिती देऊन अवगत करावे. निवड केलेल्या शेतक-यांमार्फत गावातील इतर शेतक-यांना उपाययोजनांबाबत माहितीकरीता ग्रामपंचायतीच्या फलकावर माहीती देण्यात यावी.

७.२.१ **मास्टर ट्रेनर्स प्रशिक्षण :-** शेतक-यांमध्ये जागरुकता निर्माण करण्याकरीता कृषि विभागाचे उपविभागीय कृषि अधिकारी व प्रति जिल्हा दहा मास्टर ट्रेनर्स तसेच कृषि विद्यापीठाचे जिल्हा प्रतिनिधी यांचेसाठी हंगामापूर्वी दोन दिवसाचे प्रशिक्षण संबंधित कृषि विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात यावे. याकरीता कृषि विद्यापीठाकडून प्रशिक्षण साहित्य व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन घ्याव्यात. प्रशिक्षणासाठी वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती) अंतर्गत मान्य प्रमाणकांनुसार खर्च करावा.

**(रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिन याप्रमाणे दोन दिवसांकरीता रु. १०००/-)**

७.२.२ **जिल्हा स्तरीय प्रशिक्षण :-** कृषि विद्यापीठात प्रशिक्षित करण्यात आलेल्या मास्टर्स ट्रेनर्स यांचे मार्फत जिल्हास्तरावर सर्व क्षेत्रिय कर्मचा-यांच्या प्रशिक्षणासाठी प्रति जिल्हा तरतूद करण्यात आली आहे. प्रशिक्षणासाठी प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती) अंतर्गत मान्य प्रमाणकांनुसार खर्च करावा. **जिल्हा स्तरीय प्रशिक्षणासाठीचे प्रशिक्षण साहित्य संशोधन केंद्र / कृषि विद्यापीठ यांचे कडून तयार करावे व त्यासाठीचा निधी त्यांना हस्तांतरीत करावा.**

**(रु. २५०/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिन याप्रमाणे दोन दिवसाकरीता रु. ५००/-)**

७.२.३ **गावनिहाय बैठका :-**गांवातील प्रगतशील शेतक-यांमार्फत त्यांच्या गावातील इतर शेतक-यांबरोबर कृषि विभागाच्या क्षेत्रीय कर्मचा-यांच्या मदतीने प्रति आठवडयास एक याप्रमाणे आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू या पिकांकरीता हंगामामध्ये दहा छोटया गांव बैठका आयोजित करुन शेतक-यांशी चर्चा करावी व शेतक-यांना कीड रोगाचे सर्वेक्षण व उपाययोजनेबाबतची माहिती वेळोवेळी पुरविण्यात यावी.

**७.३ शेतक-यांसाठी पीक संरक्षण सल्ला :-**

उपविभागीय कृषि अधिकारी यांनी आठवडयातून दोन वेळा ऑनलाईन प्राप्त होणारी ॲडव्हायजरी मराठी भाषेत एसएमएसद्वारे शेतक-यांना द्यावी. तसेच या ॲडव्हायजरीचा एसएमएस तालुका कृषि अधिकारी यांनाही द्यावा. तालुका कृषि अधिकारी यांनी सदर एसएमएसची मराठी भाषेतील जम्बो झेरॉक्स प्रत तयार करावी. त्यांचे अधिनस्त मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक या क्षेत्रीय कर्मचा-यांच्यामार्फत तालुक्यातील प्रत्येक गावातील कृषि वार्ताफलकावर तसेच कृषिसेवा केंद्रावर लावली जाईल असे पहावे. यासाठी रू. ५ हजार प्रति तालुका याप्रमाणे स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

तालुकानिहाय प्राप्त होणारी ॲडव्हायजरी शेतक-यांपर्यंत वेळीच पोहोचण्याच्या दृष्टिने उपविभागीय कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांनी आठवडानिहाय देण्यात येणारी ॲडव्हायजरी, वर्तमानपत्रे, रेडिओ, टि.व्ही. व इतर प्रसिध्दी माध्यमांच्या सहाय्याने प्रसिध्द करावी. तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये कीड रोगांची तिव्रता आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या वर गेल्यास अशा वेळी पत्रकार परिषदा, शेतकरी मेळावे घेऊन उपाययोजनांबाबत शेतक-यांमध्ये जनजागृती करावी.

**ज्या ठिकाणी कीड रोग तिव्रता आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या वर असेल त्या ठिकाणी किटकनाशकांचा पुरवठा होण्याच्या दृष्टिने युध्दपातळीवर मोहिम हाती घेऊन कीड रोग परिस्थिती नियंत्रणात राहिल यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करावी.**

**८. आऊटसोर्सिंगद्वारे सेवा उपलब्धता:-**

प्रकल्पांतर्गत आवश्यक कंत्राटी मनुष्यबळ नोंदणीकृत मनुष्यबळ सेवा पुरवठा करणा-या ठेकेदारांकडून आऊटसोर्सिंगद्वारे उपलब्ध करुन घ्यावे. मनुष्यबळ सेवा पुरवठा करणा-या ठेकेदारांच्या नियुक्तीसाठी विभाग स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक यांनी विहित पद्धतीने निविदा प्रक्रिया पार पाडावी. यासाठी प्रथमतः जिल्ह्याच्या ठिकाणी सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी यांचेकडे कंत्राटी कामगार (नियंत्रण आणि निर्मुलन) अधिनियम, १९७० अंतर्गत प्रिन्सिपल ऍम्पलॉयर म्हणून नोंदणी अद्ययावत करावी. निविदा प्रक्रियेनुसार निश्चित केलेल्या सदर संस्थांना त्यांचेमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या कामगारांच्या मानधनाच्या जास्तीत जास्त ५ टक्के पर्यंत सेवा आकाराची रक्कम (Service Charges) अदा करावी. याबाबतचा निविदा प्रक्रियेनुसार योग्य निर्णय विभागस्तरावर घेण्यात यावा. हॉर्टसॅप अंतर्गत कंत्राटी मनुष्यबळाचे वेतन किमान वेतन कायदा नुसार "शेतकी कामधंदा" या अंतर्गत संस्थात्मक शेतीसाठी लागू असलेल्या वेतन दराप्रमाणे निश्चित केले जाते. याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक- ८/८/२०१४ च्या अधिसुचनेद्वारे सुधारीत किमान वेतन दर जाहीर केले आहेत. त्याचा तपशिल मुद्दा क्र. ८.१.५ मध्ये तसेच, सोबत सहपत्रित केलेल्या **"प्रपत्र -ब"** मध्ये दर्शविण्यात आला आहे. सदर बदलांच्या अनुषंगाने निविदेसोबतच्या लिफापा क्र. २ मध्ये प्रकल्पांतर्गत कार्यरत कामगारांचे वेतन व ठेकेदाराच्या सेवा आकाराच्या दरांमध्ये बदल करावा, सदरच्या प्रकल्पांतर्गत कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट), संगणक प्रचालक (डाटा एंट्री ऑपरेटर), संगणक प्रणाली मदतनीस तसेच, राज्यस्तरीय संनियंत्रण कक्षासाठीच्या लेखापाल व संगणक प्रचालक (कंप्युटर ऑपरेटर) यांच्या सेवा उपलब्ध करुन घ्याव्यात. कंत्राटी कर्मचा-यांची निवड प्रक्रिया विभागीय स्तरावर संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांचे समन्वयाने करण्यात यावी. कंत्राटी पद्धतीने ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी मनुष्यबळाची नियुक्ती करताना आरक्षण अधिनियम २००४ मधील अनुक्रमांक ३ (१) (ग) नुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तिंसाठी लोकसेवेमधील व पदाकरीता रिक्त जागांच्या संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांच्या संभागातील प्रवर्गनिहाय मनुष्यबळाचा तपशिलाप्रमाणे कर्मचा-यांची निवड करुन संभागासाठी निश्चित केलेल्या मनुष्यबळ संख्येच्या अधिन राहुन

मनुष्यबळ पुरवठा करेल. विभागीय कृषि सहसंचालक यांनी चालू वर्षीच्या उत्पादनक्षम क्षेत्रानुसार कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट) यांचे कार्यक्षेत्र ठरवावे व त्याप्रमाणे नेमणुका कराव्यात. संबंधीत कर्मचा-यांच्या हजर अहवालानुसार त्यांच्या वेतनाची रक्कम संबंधीतांच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल. मनुष्यबळ उपलब्धतेच्या अनुषंगाने त्यांचा सेवा आकार म्हणून प्रत्येक कर्मचा-याच्या एका महिन्याच्या वेतनाच्या पन्नास टक्के इतकी रक्कम एकाच वेळेस त्यांना अदा करावी.

याबाबत यदाकदाचीत काही अडचणी उद्‌भवल्यास प्रकल्पांतर्गत आवश्यक मनुष्यबळ नोंदणीकृत मनुष्यबळ सेवा पुरवठा करणा-या संस्थांकडून आऊटसोर्सिंगद्वारे उपलब्ध करुन घ्यावे त्यासाठी मनुष्यबळ सेवा पुरवठा करणा-या संस्थांच्या नियुक्तीसाठी विभागीय स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक विहीत पद्धतीने निविदा प्रक्रिया पार पाडावी. यासाठी प्रथमतः जिल्ह्याच्या ठिकाणी सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी यांचेकडे कंत्राटी कामगार (नियंत्रण आणि निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत प्रिन्सिपल ऍम्पलॉयर म्हणून नोंदणी अद्ययावत करावी. निविदा प्रक्रियेनुसार निश्चित केलेल्या सदर संस्थांना त्यांचेमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या कामगारांच्या मानधनाच्या जास्तीत जास्त ५ ते १५टक्के पर्यंत सेवा आकाराची रक्कम (Service Charges) अदा करावी. याबाबतचा निर्णय विभागस्तरावर निविदा प्रक्रियेनुसार घेण्यात यावा.

खाजगी संस्थांकडून आऊटसोर्सिंगद्वारे सेवा उपलब्ध करावयाच्या कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट), संगणक प्रचालक (डाटा एंट्री ऑपरेटर), संगणक प्रणाली मदतनीस यांच्यासाठी निविदा प्रक्रिया राबविणे व त्यांच्या सेवा उपलब्ध करुन कीड रोग सर्वेक्षण प्रकल्पासाठी उपयोगात आणण्याची संपूर्ण कार्यवाही विभागीय कृषि सहसंचालक यांनी करावी. कंत्राटी पद्धतीने राबवावयाच्या निविदा प्रक्रिया व कर्मचारी नियुक्तीबाबत भविष्यात उद्‌भऊ शकणा-या समस्या टाळण्यासाठी निविदा निश्चिती करण्याच्या समितीमध्ये विभागस्तरावरील संबंधीत जिल्ह्याच्या सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी कार्यालयातील जाणकार व जबाबदार अधिकारी यांचा समावेश करावा. कंत्राटी पद्धतीने राबवावयाच्या निविदा प्रक्रिया व कर्मचारी नियुक्तीबाबत या संबंधीचे कायदे/अधिनियम, उदा. इंडस्ट्रियल डिस्पूट ॲक्ट, १९४, महाराष्ट्र रेकगनिशन ऑफ ट्रेड युनियन्स ॲन्ड प्रिव्हेंशन ऑफ अनफेअर लेबर प्रेक्टिसेस ॲक्ट, १९७१, इंडस्ट्रियल एम्पलॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) ॲक्ट, १९४६, बॉम्बे इंडस्ट्रियल एम्पलॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स, १९५९, बॉम्बे इंडस्ट्रियल एम्पलॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स, १९५९ अंतर्गत मॉडल स्टँडींग ऑर्डर्स, बॉम्बे शॉप्स ॲन्ड एस्टॅब्लीशमेंट्स ॲक्ट, १९४८, इत्यादींचा अभ्यास करुनच पुर्णतः हंगामी स्वरुपात नियुक्ती करावी. कंत्राटी पद्धतीने ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी मनुष्यबळाची नियुक्ती करताना "आरक्षण अधिनियम २००४" मधील अनुक्रमांक ३ (१) (ग) नुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागस प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तिंसाठी लोकसेवांमधील व पदाकरीता रिक्त जागांच्या आरक्षणाकरीता आणि तत्संबंधीत व तद्‌नुषंगीक बाबींसाठी असलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने आरक्षण अधिनियमानुसार विभागीय कृषि सहसंचालक यांनी प्रवर्गनिहाय मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावे. तसेच, याबाबत आवश्यकतेनुसार गरज भासल्यास कायदेशीर सल्लागाराचा सल्ला घेण्यात यावा व यासाठीचा खर्च आकस्मिक निधीतून करावा. मनुष्यबळाच्या सेवा पुरविणा-या ठेकेदारांची कार्यपद्धती व आऊटसोर्सिंगद्वारे उपलब्ध करुन घेतलेल्या मनुष्यबळाच्या सेवांचे नियमन व वेतन वितरण कार्यपद्धती मुद्दा क्र. ९ प्रमाणे राहिल. मनुष्यबळ सेवा पुरवठा करणा-या संस्थेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांसोबत पत्रव्यवहार करताना, क्षेत्रिय अधिका-यांनी थेट कर्मचा-यांशी पत्रव्यवहार न करता संस्थेमार्फत करावा. तसेच, कामाचा अनुभव किंवा उल्लेखनीय काम केल्याबाबतचे प्रशस्तीपत्रक थेट कर्मचा-यांना देण्यात येऊ नये. सदर निवड व पदस्थापनेची प्रक्रिया ३० जून, २०१६ पुर्वी करण्यात यावी. मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी मागावावयाच्या निविदेतील अटीशर्ती पुढीलप्रमाणे असतील.

**८.१. हॉर्टसॅप प्रकल्पाकरीता कृषि क्षेत्रातील कुशल व अर्धकुशल कामगारांच्या सेवा उपलब्धतेबाबत राबवावयाच्या ई-निविदासाठीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

८.१.१. नोंदणीकृत/परवानाधारक मनुष्यबळाच्या सेवा पुरवठादार संस्थांकडून मोहोरबंद निविदा मागवाव्यात.

८.१.२. नोंदणीकृत/परवानाधारक मनुष्यबळाच्या सेवा पुरवठादार संस्थेची निविदा मंजूर झाल्यास त्या संस्थे कडे कंत्राटी कामगार(नियंत्रण आणि निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत संबंधीत जिल्ह्यासाठी २० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार संख्या असल्यास अशा ठिकाणी नोंदणी परवाना असणे आवश्यक आहे. परवाना नसल्यास, तो परवाना पंधरा दिवसात प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

८.१.३. विभागीय कृषि सहसंचालक यांना **प्रपत्र "अ"** नुसार ३१ मे, २०१७ पर्यंत प्रपत्रातील वेगवेगळ्या कालावधीनुसार आवश्यक संख्येप्रमाणे मासिक वेतनावर कुशल / अर्धकुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

८.१.४. कंत्राटी पद्धतीने ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी मनुष्यबळाची नियुक्ती करताना आरक्षण अधिनियम २००४ मधील अनुक्रमांक ३ (१) (ग) नुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तिंसाठी लोकसेवांमधील व पदाकरीता रिक्त जागांच्या आरक्षणाकरीता आणि तत्संबंधीत व तदनुषंगीक बाबींसाठी असलेल्या तरतूदींच्य अनुषंगाने आरक्षण अधिनियमानुसार संबंधीत मनुष्यबळ सेवा ठेकेदाराने विभागीय कृषि सहसंचालक यांच्या मागणीनुसार प्रवर्गनिहाय मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

८.१.५. इच्छुक मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने संगणक प्रचालक (डेटा एंट्री ऑपरेटर) यांना रु. ४६८०/- संगणक प्रणाली मदतनीस यांना रु. ८१००/-, लेखापाल यास रु. ६७५०/- इतके मुळ मासिक वेतन, तसेच, कामगार कायद्याप्रमाणे निश्चित असलेल्या घरभाडे भत्ता, रजा रोखीकरण व लाभांक्ष यांच्या आधारावर टक्केवारीमध्ये सेवा आकाराचे (Service Charges) दर राहतील. तर कीड सर्वेक्षक यांना रु. ४६८०/- इतके मुळ मासिक वेतन, कामगार कायद्याप्रमाणे निश्चित असलेल्या घरभाडे भत्ता, रजा रोखीकरण, लाभांश यांचेसह रु. १५००/- इतका मासिक प्रवास भत्ता यांच्या आधारावर टक्केवारीमध्ये सेवा आकाराचे (Service Charges) दर राहतील. घर भाडे भत्ता, कामगार भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा, सेवा कर, रजा रोखीकरण, लाभांक्ष इत्यादी कामगार कायद्याप्रमाणे निश्चित केले असून निविदे सोबतच्या प्रपत्रात दर्शविण्यात येतील. कीड सर्वेक्षक, संगणक प्रचालक, संगणक प्रणाली मदतनीस, लेखापाल यांच्या जबाबदा-या व कामाच्या ठिकाणाबाबत निविदेतील तपशिलाचे अवलोकन करुन त्यानुसार सेवा आकाराचे दर नमुद करावेत. पुरवठा करण्यात येणा-या मनुष्यबळाच्या बाबतीत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संपुर्ण:त दायित्व संबंधीत मनुष्यबळ सेवा ठेकेदाराचे असेल.

८.१.६. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून सेवा पुरविण्यासाठी कळविण्यात आलेल्या सेवा आकाराच्या दराचा(Service Charges) विचार निविदा मंजुरीबाबत निर्णय घेण्यासाठी करण्यात येईल.

८.१.७. निविदे बरोबर रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) इतक्या अनामत/बयाणा/इसारा रकमेचा धनाकर्ष नसल्यास निविदा पात्र ठरणार नाही.

८.१.८. निविदा अर्जाची रक्कम रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) ना परतावा इतकी असेल.

८.१.९. संबंधीत सेवा करार कालावधी आंबा या पिकांकरीता कीड सर्वेक्षक, संगणक प्रचालक यांचा ७ महिने व डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांकरीता कीड सर्वेक्षक, संगणक प्रचालक व संगणक प्रणाली मदतनीस यांचा ११ महिने इतका असेल. तर लेखापाल व संगणक प्रचालक (राज्य) यांचेकरीता ११ महिने असेल. तथापि, विभागीय कृषि सहसंचालक आवश्यकतेनुसार यामध्ये बदल करु शकतील.

८.१.१०. मनुष्यबळ सेवा पुरवठादारांकडून कंत्राटी पद्धतीच्या कामगार कायद्याची (Contract Labour Act) पूर्तता होत असली पाहिजे यासाठी यापुर्वीच्या एक वर्षातील केलेल्या कामाचा तपशिल जोडणे आवश्यक राहील.

८.१.११. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारांकडून याबाबतीत लागू असलेल्या अन्य कामगार कायद्यांची पूर्तता करणे आवश्यक राहील.

८.१.१२. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडे भविष्य निर्वाह निधी खात्याकडे नोंदणीबाबत कोड नंबर, सेवा कर, व्यवसाय कर, लागू असेल तेथे राज्य कामगार विमा योजनेचा कोड नंबर अथवा कामगार भरपाई कायद्यानुसार (Workmen's Compensation Act) विमा पॉलिसी नंबर असणे आवश्यक आहे. निविदेसोबत वरील बाबींच्या प्रमाणित प्रती जोडाव्यात.

८.१.१३. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराची मागील दोन वर्षातील आर्थिक उलाढाल/लेखा व्यवहार सनदी लेखापालाकडून प्रमाणित करण्यात आलेले असावेत.

८.१.१४. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने शासकीय/निमशासकीय किंवा नामांकीत संस्थांना विविध प्रकारचे मनुष्यबळ उपलब्ध करुन देत असलेबाबत कमीतकमी २ वर्ष अनुभवाचा पुरावा जोडावा.

८.१.१५. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास कंत्राट देण्यापूर्वी संबंधीत मनुष्यबळ सेवा पूरवठादाराकडून कर्तव्यपालनाबाबत रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) इतक्या अनामत रकमेची बँक हमी देणे आवश्यक आहे. सदर ठेकेदाराने बँक हमी दिल्यानंतर त्या ठेकेदारास अनामत/बयाणा/इसारा रक्कम परत करण्यात येईल व सदर बँक हमी संपूर्ण कंत्राटी कालावधी यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर मुद्या क्र. ८.१.१६, ८.१.१७ तसेच, याबाबतीत आवश्यक अभिलेखांची पडताळणी केल्यानंतर परत करण्यात येईल.  वरीलप्रमाणे द्यावयाची बॅक हमी लेखा अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक यांचे नावे देण्यात यावी.

८.१.१६. मनुष्यबळ सेवा पुरवठादारास देय असलेली रक्कम राज्य/केंद्र सरकारच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या विविध नियमांच्या अधिन असलेल्या कर/उपकाराची वजावट तसेच, महिना अखेर सोपविण्यात आलेल्या कामाची पूर्तता केल्यानंतर देण्यात येईल.

८.१.१७. मनुष्यबळ सेवा पुरवठादार संस्थेस केंद्र व राज्य शासनाकडून कामगार कायद्याअंतर्गत वेळोवेळी ठरविले जाणारे सेवाकर, उत्पन्नकर, निर्वाह निधी, कंपनी कायदाकर व्यवसायकर व इतर अतिरिक्त कर वजावटीचे दायित्व, कर्मचारी कल्याण व इतर अनुषंगिक जबाबदा-या की ज्या इथे नमूद केलेल्या नाहीत पार पाडणे बंधनकारक आहे. याबाबतच्या कायद्यांचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. याबाबतीत संबंधीत संस्थाकडून प्रत्येक महिन्याला पालन केले जाईल याची खात्री देण्यात यावी.

८.१.१८. सदर ठेकेदाराने संबधीत कामगारांना दिलेल्या वेतनाची नोंद स्वतंत्ररित्या ठेवली पाहिजे याबाबत मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक/हजेरीपत्रक(Muster Roll Cum Wage Register) ठेवले पाहिजे. कामगार कायद्याप्रमाणे कामगारांचे नावे जमा करावयाच्या कामगार भविष्य निर्वाह निधी, लागू असेल तेथे राज्य कामगार विमा रक्कम अथवा कामगार भरपाई कायद्यानुसार(Workmen’s Compensation Act) विमा पॉलिसी रक्कम, सेवा कर, व्यवसाय कर व इतर रकमा संबंधीत महिन्यात चलनाने भरणे बंधनकारक आहे. सदर रकम्मा भरल्याचे चलनाच्या प्रमाणित प्रती, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक /हजेरीपत्रकाची प्रमाणित प्रत व इतर माहिती संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करणे आवश्यक राहील. याबाबत कृषि आयुक्तालयाने मागणी केल्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

८.१.१९. प्रत्येक महिन्याच्या एक तारखेपर्यंत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने कामगारांचा उपस्थिती अहवाल, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक/हजेरीपत्राकाची (Muster Roll Cum Wage Register) प्रमाणित प्रतीसह कामगारांचे वेतन देयक (शासकिय वजावटीच्या तपशिलासह) व मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराचे सेवा आकाराचे देयक अशी दोन स्वतंत्र देयके तसेच, मुद्दा क्र. ८.१.१६ व ८.१.१७ मध्ये नमुद केलेल्या रकमा चलनाने भरल्याच्या प्रमाणित प्रती (मागील महिन्याच्या) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर कराव्यात. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून सादर करण्यात आलेला उपस्थिती अहवाल, वेतन देयक, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक/ हजेरीपत्रकाची (Muster Roll Cum Wage Register) प्रमाणित प्रत व  मागील महिन्यात भरणा केलेल्या चलनाच्या प्रमाणित प्रतींची तपासणी व पडताळणी उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या अहवाल व हजेरीपत्राआधारे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून करण्यात येईल व संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास दहा तारखेपर्यंत देयक अदा करण्यात येईल. प्रकल्पाअंतर्गत पुरवठा केलेल्या कामगारांच्या नावे जमा करावयाच्या कामगार भविष्य निर्वाह निधी, लागू असेल तेथे राज्य कामगार विमा रक्कम अथवा कामगार भरपाई कायद्यानुसार (Workmen’s Compensation ACT) विमा पॉलिसी रक्कम, सेवा कर, व्यवसाय कर व इतर रक्कमा प्रकल्पाकरीता स्वतंत्र चलनाद्वारे भरणे आवश्यक राहील व त्याची यादी व तपशिल देयकासोबत दर्शविणे आवश्यक राहील.

८.१.२०. मनुष्यबळ सेवा पुरवठादार संस्थाकडून संबंधीत कंत्राटी कामगारांचे वेतन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

८.१.२१. वेतन अदायगीच्या विवादाबद्दल अथवा इतर विवादांमुळे कामगारांना वेतन दिले न गेल्यास मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास देय असलेली रक्कम विभागीय कृषि सहसंचालक यांच्या तडजोडीनंतर किंवा संबंधीत प्राधिकरणाच्या आदेशानंतर अदा करणेत येईल. सदर विवाद मिटविण्याची सर्वस्वी कायदेशीर जबाबदारी संबधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारांची राहील. त्याबाबत न्यायालयीन प्रकरणे, कायदेशीर प्रक्रिया यास सदर ठेकेदार जबाबदार राहील.

८.१.२२. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून उपलब्ध करुन देण्यात येणा-या कोणत्याही कामगाराच्या बाबतीत निर्माण होणा-या कोणत्याही विवादाची पुर्णतः जबाबदारी संबधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराची असेल तसेच, मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून नियुक्त केलेले कामगार हे पुर्णपणे संबंधीत ठेकेदाराचे राहतील त्यांच्या शासकीय सेवेशी कोणत्याही संबंध असणार नाही. तसेच, त्यांना शासनाकडून या सेवा नियमित करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही याची मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने संबंधीत मनुष्यबळाला लेखी स्वरुपात कल्पना देणे व याबाबत त्यांची लेखी संमती त्यांचे स्वाक्षरीने घेणे बंधनकारक आहे.

८.१.२३. ठेकेदाराने संबधीत कामगारास तो करीत असलेल्या कर्तव्य कालावधीत होणा-या अपघाताच्या जोखमीची खात्री देणे आवश्यक आहे. पूरवठा करण्यात आलेल्या कामगारांना होणा-या कोणत्याही प्रकारच्या इजा, अपघाताची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील.

८.१.२४. कोणत्याही कामगारास झालेल्या इजेबाबत, अपघाताबाबत वा आजाराबाबत कोणत्याही प्रकारच्या भरपाईचे संपूर्ण दायित्व संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठा ठेकेदाराचेच असेल. कामगारांना लागू असेल तेथे राज्य कामगार विमा अथवा कामगार भरपाई कायद्यानुसार (Workmen's Compensation ACT) विमा संरक्षण संबधीत ठेकेदाराने देणे बंधनकारक आहे.

८.१.२५. आवश्यक वाटल्यास, विभागीय कृषि सहसंचालक किंवा मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून पुरवण्यात येणारा गणवेश संबंधीत कामगाराने त्याच्या नावासह परीधान करणे आवश्यक आहे. यामध्ये कसूर केल्यास त्या कामगाराचे संबंधीत दिवसाचे वेतन कपात करण्यात येईल.

८.१.२६. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने विविध कामगार कायद्याअंतर्गत विहीत अभिलेख, दैनंदिन उपस्थिती नोंदवही ठेवावी व त्यामध्ये दररोज हजर असलेल्या कामगारांची नावे व संख्यांची नोंद घ्यावी ही सर्वस्वी संबंधीत ठेकेदाराचीच जबाबदारी राहील.

८.१.२७. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने त्यांनी उपलब्ध करुन द्यावयाच्या मनुष्यबळावरील कामकाजाच्या देखरेखीची स्वतंत्र व्यवस्था त्यांचे स्तरावरुन करावी.

८.१.२८. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून पुरविण्यात येणा-या कामगारांची प्रकल्पातील कामाच्या दृष्टीने योग्यता विभागीय कृषि सहसंचालक यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत तपासून कामगारांची निवड करण्यात येईल. यासाठी ठेकेदाराने आवश्यक कामगार संख्येच्या १:३ (एक कामगारासाठी तीन कामगार)याप्रमाणात कामगार तयार ठेवावेत. तसेच, कृषि विभागाच्या नियंत्रण/ पर्यवेक्षण अधिका-याकडून विशिष्ठ कामगाराच्या कामाबाबत तक्रारी असल्यास सदर कामगाराचे बदल्यात व त्याच वेतनात दुसरा कामगार तात्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील जेणेकरुन सेवा कामात व्यत्यय येणार नाही हे पहाणे ही पुर्णतः ठेकेदाराची जबाबदारी राहील.

८.१.२९. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून त्यांच्या कार्यालयात तक्रार नोंदवही ठेवण्यात यावी. तक्रार नोंदवहीत नोंदविलेल्या तक्रारी, तसेच प्राप्त होणा-या इतर तक्रारींची दखल ठेकेदाराने घेऊन त्यांचे वेळोवेळी कायदेशीरपणे निराकरण करणे व त्याचा अहवाल कामगार आयुक्त कार्यालय व संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

८.१.३०. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून आवश्यक असणारे मनुष्यबळ पुरविण्यात यावे. आवश्यक संख्येपेक्षा कमी मनुष्यबळ उपलब्ध करुन दिल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी शासनास जो काही खर्च येईल तो दंड म्हणून विभागीय कृषि सहसंचालक संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून वसूल करतील.

८.१.३१. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास स्वेच्छेने अथवा इतर कारणासाठी अचानकपणे कंत्राट रद्द करता येणार नाही. असे करावयाचे असल्यास किमान ६० दिवस अगोदर विहित नोटिसेद्वारे संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांना कळविणे आवश्यक आहे याचे पालन न झाल्यास अशा परिस्थितीत कराराचा भंग केल्या प्रकरणी संबंधीत ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल तसेच, दुसरी पर्यायी सोय होण्यासाठी इतर ठेकेदारास कंत्राट देईपर्यंत येणा-या खर्चाची व इतर बाकी असल्यास त्याची वसूली संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून करण्यात येईल व आवश्यकतेनुरुप कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

८.१.३२. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून अटी व शर्तीचा वेळोवळी भंग झाल्यास अथवा आवश्यक मनुष्यबळ पुरवठा करण्यास अपयशी झाल्यास अशा परिस्थितीत विभागीय कृषि सहसंचालक संबंधीतास त्वरीत करणे दाखवा नोटीसीद्वारे कळवतील तसेच, परिस्थितीनुरुप सदर ठेकेदाराचे कंत्राट समाप्त करुन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व पुढील कायदेशीर कारवाई कामगार आयुक्त व विधी सल्लागाराच्या सल्ल्याने करण्यात येईल.

८.१.३३. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची लवादामार्फत किंमत ठरविली जाईल या लवादामध्ये विभागीय कृषि सहसंचालक, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी, दोन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील लेखा अधिकारी व नुकसानी संबंधीत विशेषज्ञ यांचा समावेश असेल. संबधीत ठेकेदाराने ही रक्कम दोन महिन्यांच्या आत भरपाई करुन देण्याबाबत रु. १०० च्या अशासकीय मुद्रांकावर सक्षम अधिका-यापुढे शपथ पत्राद्वारे लिहून देणे आवश्यक आहे. याबाबत पुर्तता न झाल्यास प्रचलित कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

८.१.३४. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून उपलब्ध करुन दिलेल्या कामगाराकडून कर्तव्यामध्ये दुर्लक्ष/कसूर केल्यामुळे शासनाचे नुकसान झाल्यास संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदार व विभागीय कृषि सहसंचालक यांच्या संयुक्त समितीच्या चौकशीनंतर संबधीत ठेकेदाराकडून नुकसान भरपाई वसूल करण्याचा अधिकार विभागीय कृषि सहसंचालक यांना राहील.

८.१.३५. निविदेमधील मनुष्यबळाच्या संख्येमध्ये तसेच, त्यांच्या कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार सेवा पुरवठादार ठेकेदाराशी चर्चा करुन कमी अथवा जादा बदल होऊ शकतो.

८.१.३६. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून पुरविण्यात येणारे मनुष्यबळ त्यांचे कार्य पार पाडण्यासाठी शारिरीक दृष्ट्या सक्षम असावे.

८.१.३७. शासन निर्णय रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्रमांक रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१, दिनांक-१७ ऑगस्ट, २००२ तसेच, कृषि व पदुम विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक रोजगार-१००४/प्र.क्र.७९/१३-अे, दिनांक-१८ ऑगस्ट, २००५, शासन निर्णय रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्रमांक इएसई-२००३/प्र.क्र.१९१/रोस्वरो-१, दिनांक-१ फेब्रुवारी, २००६ नुसार बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था/ लोकसेवा केंद्र यांना अनामत रक्कम व अनुभवाच्या अटीमध्ये सूट देण्यात येईल तथापि, त्यांना इतर अटी व शर्तींचे पालन करणे अनिवार्य राहील. (सदर बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था/लोकसेवा केंद्र यांनी निविदे सोबत महाराष्ट्र राज्य सहाकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणी प्रमाणपत्र जोडावे)

८.१.३८. विभागीय कृषि सहसंचालक हे कोणत्याही ठेकेदारास कंत्राट देण्यापूर्वी कोणतेही कारण न देता संबंधीत निविदाधारक किंवा निविदाधारकांच्या बाबतीत कोणतेही दायित्व अथवा जबाबदारी न स्विकारता कोणतीही निविदा स्विकारणे/नाकारणे/रद्द करणे किंवा सर्व निविदा नागरण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

८.१.३९. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास वरील नियम व अटी मान्य असलेबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तसेच, कृषि आयुक्तालयासाठी पुरवठा करावयाच्या कामगारांच्या बाबतीत विभागीय कृषि सहसंचालक, पुणे यांचेबरोबर रु. १०० च्या अशासकीय मुद्रांकावर सेवा करारनामा लिहून द्यावा लागेल.

सहभागी संस्थांसाठी आवश्यक संशोधन सहयोगी व संगणक प्रचालक यांच्या सेवा निश्चित कालावधी करीता संबंधीत संस्थांकडून आऊटसोर्सिंगद्वारे/भारतीय कृषि संशोधन परिषद यांच्या प्रमाणकांप्रमाणे उपलब्ध करुन

घ्याव्यात. तथापि, भारतीय कृषि संशोधन परिषद यांच्या प्रमाणकांप्रमाणे उपलब्ध करुन घेण्यात येणा-या कामगारांचा शासकीय सेवेशी कोणताही संबंध असणार नाही तसेच, त्यांना शासनाकडून या सेवा नियमित करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही व याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधीत संस्थांची राहील. कृषि आयुक्तालय स्तरावरील कक्षासाठी संशोधन सहयोगी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचेकडून करुन घ्यावेत.

कीड सवेक्षकांच्या सनियंत्रणासाठी कृषि पर्यवेक्षक यांनी काम करावयाचे असल्याने विभागीय कृषि सहसंचालकांनी संबंधीत विभागातून त्यांची उपलब्धता करुन घ्यावी. याबाबतचे आदेश विभागीय कृषि सहसंचालक यांनी निर्गमित करुन सदर कृषि पर्यवेक्षक संबंधीत मुख्यालयी निर्धारीत वेळेत सर्वेक्षण कामाकरीता हजर होतील याबाबतची कार्यवाही करावी. कीड रोग सर्वेक्षणाचे काम निर्धारीत वेळेत करावयाचे असल्याने सर्वेक्षणकामी सेवा अधिगृहीत केलेल्या पर्यवेक्षकांकडे इतर योजनांची कामे सोपऊ नयेत.

प्रकल्पांतर्गत आवश्यक कामगारांची जिल्हानिहाय संख्या सोबत जोडण्यात आलेली असून त्यांची आर्हता कर्तव्ये व जबाबदा-या पुढील प्रमाणे राहतील.

८.२. **कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट) :** आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू या पिकांसाठी प्रति ५०० ते २००० हेक्टर साठी १ कीड सर्वेक्षक प्रस्तावित करण्यात आले असून त्यांना दरमहा रु.४६८०/- इतके मूळ मासिक वेतन, प्रवास भत्ता तसेच इतर सेवा कर व सेवा आकारासह एकुण रू.१०७२०/- (मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराच्या सेवा आकारासह) वेतन प्रस्तावीत आहे.

**शैक्षणिक अर्हता:**

१. उमेदवार किमान कृषि पदवीकाधारक असावा. तथापि पदवीधर व पदव्यूत्तर पदवीधारकास प्राधान्य देण्यात यावे.
२. स्थानिक तालुक्यात व उपविभागात राहणा-या उमेदवारास प्राधान्य द्यावे.
३. वय २१ ते ४५ वर्षे

**सेवा कालावधी –**

१. आंबा – १ नोव्हेंबर २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण ६८ कीड सर्वेक्षक (सात महिने)
२. डाळींब - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण ५८ कीड सर्वेक्षक (अकरा महिने)
३. केळी - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण २१ कीड सर्वेक्षक (अकरा महिने)
४. संत्रा - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण ४७ कीड सर्वेक्षक (अकरा महिने)
५. मोसंबी - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण २० कीड सर्वेक्षक (अकरा महिने)
६. चिकू - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण १ कीड सर्वेक्षक (अकरा महिने)

**८.२.१ कर्तव्य व जबाबदा-या -**

१. कीड सर्वेक्षकांसाठी गाव व क्षेत्र निवडीसाठी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पुर्व निश्चित क्षेत्रात कीड सर्वेक्षक आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू पिकांकरीता कीड सर्वेक्षण करतील.
२. कीड सर्वेक्षक कृषि पर्यवेक्षकाच्या अधिनस्त काम करतील.
३. कीड सर्वेक्षक निश्चित केलेल्या शेताकरीता प्लॉट (४) कीड व रोगांची निरीक्षणे घेतील आणि प्रत्येक गावातील रॅण्डम पध्दतीने ४ बागा ठरवून दिलेले क्षेत्र किंवा एकाच गावातील ४ पेक्षा जास्त बागा (पिकाच्या लागवडीखालील क्षेत्रावर अवलंबून) करीता सुध्दा कीड व रोगांची निरीक्षणे घेतील अशाप्रकारे एकूण एकाच गावातील ४ शेतांतील कीड व रोगांची निरीक्षणे कीड सर्वेक्षक (प्रशिक्षण कार्यक्रमाच्या वेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार) घेतील. अशाप्रकारे २ गावांकरीता कीड सर्वेक्षक दर सोमवार, मंगळवार, गुरुवार आणि शुक्रवार या चार दिवशी कीड रोगांचे सर्वेक्षण करण्याकरीता निरीक्षण घेतील.
४. कीड सर्वेक्षक कीड सर्वेक्षण अहवाल कीड नियंत्रकांकडे (कृषि पर्यवेक्षक) आठवड्यातून दोनदा म्हणजेच दर बुधवारी आणि शनिवारी सादर करतील.

५. कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक हे कृषि विद्यापीठ व कृषि विभाग यांचेकडून आयोजित केलेल्या प्रशिक्षणात दिलेल्या तांत्रिक निकषांनुसार कीड रोग सर्वेक्षणाचे काम करतील.
६. कीड सर्वेक्षक हे ग्रामीण भागातच राहून पिकांवरील कीड व रोगाकरीताची निरीक्षणे घेतील.
७. कीड सर्वेक्षक यांनी त्यांच्यासाठी आयोजित केलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमधून कीड रोग सर्वेक्षणासंबंधीची माहिती घेतली पाहिजे.
८. कृषि पर्यवेक्षकांच्या मार्गदर्शनानुसार सर्वेक्षणाकरीता निवडलेल्या शेतात सापळे बसविणे तसेच वेळोवेळी सापळयातील लूर बदलणे ही कीड सर्वेक्षकाची जबाबदारी राहिल.
९. शेतामधील निरीक्षणे वेळीच घेण्यासाठी कीड सर्वेक्षकाजवळ प्रवासाची साधने व प्रवासाबद्दलची माहिती याचे चांगले ज्ञान असणे आवश्यक असून प्रवासाची आवड असावी.
१०. कीड सर्वेक्षकाने शेतकरी, कृषि विभाग आणि इतर अधिकारी यांचेशी सतत संपर्कात रहावे.
११. मार्गदर्शक सुचनांप्रमाणे कीड सर्वेक्षकाने नेमून दिलेल्या क्षेत्राकरीता धावते सर्वेक्षण (रोव्हिंग सर्व्हे) करावयाचा आहे.

**८.३ संगणक प्रचालक (डेटा एन्ट्री ऑपरेटर) :** कीड रोग सर्वेक्षण अहवालांची ऑनलाईन नोंद करण्यासाठी प्रति कृषि पर्यवेक्षकाकरीता एक संगणक प्रचालक प्रस्तावित करण्यात आला असून त्यांना दरमहा रु.४६८०/- इतके मूळ मासिक वेतन तसेच इतर सेवा कर व सेवा आकारासह एकुण रू. ८८५०/- (मनुष्यबळ सेवा पुरवठादार संस्थेच्या सेवा आकारासह) मानधन प्रस्तावीत आहे.

**शैक्षणिक अर्हता:**

१. उमेदवार किमान १२ वी पास व महाराष्ट्र ज्ञानमंडळाचा एम. एस. सी. आय. टी. संगणक प्रमाणपत्र धारक असावा तसेच तो टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण असावा.
२. स्थानिक तालुक्यात, उपविभागात राहणा-या उमेदवारास प्राधान्य द्यावे.
३. वय २१ ते ४५ वर्षे

**सेवा कालावधी –**

१. आंबा – १ नोव्हेंबर २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण १४ संगणक प्रचालक (सात महिने)
२. डाळींब - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण १५ संगणक प्रचालक (अकरा महिने)
३. केळी - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण ७ संगणक प्रचालक (अकरा महिने)
४. संत्रा - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण ८ संगणक प्रचालक (अकरा महिने)
५. मोसंबी - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण ४ संगणक प्रचालक (अकरा महिने)
६. चिकू - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण १ संगणक प्रचालक (अकरा महिने)

**कर्तव्य व जबाबदा-या -**

१. संगणकावर ऑनलाईन डाटा नियमितपणे भरण्याची मुख्य जबाबदारी संगणक प्रचालकाची आहे.
२. उपविभागीय कृषि अधिकारी व कृषि पर्यवेक्षक यांच्या संपूर्ण नियंत्रण व मार्गदर्शनाखाली संगणक प्रचालक काम करतील.
३. कार्यालयीन अभिलेखांचे वर्गिकरण व देखभाल करणे तसेच कीड/रोग सर्वेक्षणांतर्गत कीड सर्वेक्षकांनी दिलेली कीड रोग सर्वेक्षणाबद्दलची माहिती ऑनलाईन भरणे आणि एनसीआयपीएम, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेत स्थळावर (वेब साईट) पुरविलेल्या माहितीचे संकलन उपविभागीय कृषि अधिकारी व कृषि पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्याची संपूर्ण जबाबदारी संगणक प्रचालक यांची राहिल.
४. कृषि पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विद्यापीठांना एसएमएस, वेब मेसेजेस, ई-मेल पाठविणे आणि त्यांचेकडून पिकसंरक्षण सल्ला मिळालेनंतर त्याचे संबंधित शेतकरी, अधिकारी व क्षेत्रिय पातळीवरील कर्मचा-यांना संगणकाधारीत संपर्क साधनांद्वारे अग्रेषित करण्याची जबाबदारी संगणक प्रचालकाची राहिल.

५. संगणक प्रचालकाने त्याला नेमून दिलेल्या विषय/कामासंबंधी सर्व पत्रव्यवहारांच्या प्रती टंकलिखित करुन पाठविण्याची जबाबदारी पार पाडावी.
६. संगणक/लॅपटॉप व इतर अनुषंगिक साहित्याची काळजी घेण्याची जबाबदारी संगणक प्रचालकाची राहिल.
७. कीड सर्वेक्षक हे कृषि पर्यवेक्षक व उपविभागीय कृषि अधिकारी यांचे संगणक/लॅपटॉप व इतर अनुषंगिक साहित्य यांची दुरुस्ती व देखभाल यासंबंधी त्यांना सुचित करुन आवश्यक ते मार्गदर्शन घेतील.

**८.४ कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर)** : प्रति १० कीड सर्वेक्षकांच्या सनियंत्रणसाठी एक कृषि पर्यवेक्षक प्रस्तावित करण्यात आला आहे. कीड सर्वेक्षण कामाच्या आवश्यक फिरतीकरीता वाहन उपलब्ध करून देण्यासाठी रू. २०,०००/- रक्कम दरमहा प्रमाणे संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे तरतूद करुन देण्यात आली आहे. विभागीय कृषि सहसंचालक यांनी यासाठी त्यांच्या विभागातून योग्य कृषि पर्यवेक्षकांची नांवे निश्चीत करुन त्यांच्या सेवा उपलब्ध करुन घ्यावात.

**शैक्षणिक अर्हता:**
१. कृषि पर्यवेक्षक कृषि पदवीधर असावा. पदव्यूत्तर पदवीधारकांस प्राधान्य देण्यात यावे.
२. कृषि पर्यवेक्षक शक्यतो टि.ओ. एफ. प्रशिक्षीत असावा.
३. स्थानिक तालुक्यात, उपविभागात राहणा-या कृषि पर्यवेक्षकांस प्राधान्य द्यावे.
४. वय २१ ते ४५ वर्षे

**सेवा कालावधी –**
१. आंबा – १ नोव्हेंबर २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण १४ कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर) (सात महिने)
२. डाळींब - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण १५ कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर) (अकरा महिने)
३. केळी - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण ७ कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर) (अकरा महिने)
४. संत्रा - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण ८ कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर) (अकरा महिने)
५. मोसंबी - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण ४ कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर) (अकरा महिने)
६. चिकू - १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७
एकूण १ कृषि पर्यवेक्षक (पेस्ट मॉनिटर) (अकरा महिने)

**कर्तव्य व जबाबदा-या -**
१. उपविभागीय कृषि अधिकारी व कीड सर्वेक्षकांमध्ये कीड-रोग सर्वेक्षणाबाबत कृषि पर्यवेक्षक समन्वय साधेल.
२. ऑनलाईन प्रपत्रे पाठविणे, सर्वेक्षणाचे कार्य व्यवस्थित पार पाडणे व त्यामध्ये समन्वय ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी कृषि पर्यवेक्षकांची राहिल.
३. कृषि पर्यवेक्षक हे संपुर्णतः उपविभागीय कृषि अधिकारी यांचे अधिनस्त व नियंत्रणात काम करतील
४. कृषि पर्यवेक्षक त्यांच्या कार्यक्षेत्रातील कीड सर्वेक्षकांकडून सर्वेक्षण प्रपत्रे संकलीत करुन घेतील व त्याबाबत उपविभागीय कृषि अधिकारी यांना अवगत करतील.
५. संगणक प्रचालकाचे मदतीने ऑनलाईन प्रपत्रे पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी कृषि पर्यवेक्षकाची राहील.
६. कृषि पर्यवेक्षक कृषि विद्यापीठ जिल्हा प्रतिनिधी, कीड सर्वेक्षक व शेतकरी याचेंशी कीड सर्वेक्षण कार्यक्रमाच्या परिणामकारक नियोजनाबाबत संपर्क ठेवतील.
७. कीड सर्वेक्षण कार्यक्रम तसेच उपविभागीय कृषि अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली एकात्मिक कीड व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्याबाबतचे संनियंत्रण करतील. एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा कार्यक्रम समाधानकारकपणे राबविला जात नसल्यास उपविभागीय कृषि अधिकारी संबंधित जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी व कृषि विद्यापीठ यांचे निदर्शनास आणतील व त्यामध्ये सुधारणा प्रस्तावीत करतील.
८. कृषि पर्यवेक्षक काही शेतक-यांच्या जनजागरण कार्यक्रमास उपस्थित राहतील व प्रगतशील शेतक-यांना, कीड सर्वेक्षकांना तसेच क्षेत्रीय कर्मचा-यांना कीडरोग सर्वेक्षणाबाबत मार्गदर्शन करतील.

९. ज्या तालुक्यात कीड रोग प्रादुर्भाव जास्त आहे किंवा आर्थिक नुकसान पातळीपर्यंत पोहचला आहे अशा कमीत कमी एका तालुक्यास कृषि पर्यवेक्षक प्रत्येक आठवडयास भेट देतील व त्याबाबतचा अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांना देतील व त्यामध्ये राबविल्या जात असलेल्या एकात्मिक किड व्यवस्थापनाबाबतची स्थिती, गुणवत्ता, येणा-या अडचणी याबाबत माहिती देऊन येणा-या अडचणींबर उपाय सुचवतील.

१०. जिल्हा नोडल अधिकारी, कृषि विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्र प्रतिनिधी यांच्याशी संपर्कात राहून कीड रोग सर्वेक्षण कार्यक्रम परीणामकारक होत असलेबाबत खात्री करतील.

११. विद्यापीठाकडून सुचविलेला ऑनलाईन एस.एम.एस सल्ला संगणक प्रचालकांच्या मदतीने संकेतस्थळावरुन काढणे व संबंधित तालुक्यातील नोंदणी झालेल्या मोबाईलधारक शेतक-यांना पाठविण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांना मदत करतील.

१२. कीड सर्वेक्षक व संगणक प्रचालक यांच्या कामाबाबतचा अहवाल व उपस्थिती याबाबतची माहिती संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करणे.

वरील जबाबदा-या व्यतिरिक्त कृषि पर्यवेक्षक यांनी उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून सर्वेक्षण व एकात्मिक कीड व्यवस्थापनासंबंधीत वेळोवेळी देण्यात आलेले कार्य पार पाडावे तसेच **कृषि पर्यवेक्षकांसाठी गाव व क्षेत्र निवडीसाठी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्य पार पाडावे.**

**८.५ संगणक प्रणाली मदतनीस (सॉफ्टवेअर सपोर्टर):** कृषि पर्यवेक्षकांस लॅपटॉप संबंधी येणा-या अडचणींची सोडवणूक करणेकरिता विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर यांनी प्रत्येकी १ याप्रमाणे ८ संगणक प्रणाली मदतनीस उपलब्ध असून त्याचा वापर करावा. त्यांना दरमहा रु. ८१००/- इतके मूळ मासिक वेतन तसेच इतर सेवा कर व सेवा आकारासह एकुण रू. १४४५०/- (मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराच्या सेवा आकारासह) वेतन प्रस्तावीत आहे.

**शैक्षणिक अर्हता:** १. उमेदवार किमान संगणक शास्त्र/संगणक ॲप्लिकेशन्स मधील पदव्युत्तर पदवी धारक असावा
२. मायक्रोसॉफ्ट मधील नेट तंत्रज्ञान अवगत असावे
३. वय २१ ते ४५ वर्षे

**सेवा कालावधी -** १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ (अकरा महिने)

**८.५.१ कर्तव्य व जबाबदा-या -**

१. कृषि पर्यवेक्षकांकडील लॅपटॉपमधील कीड रोग सर्वेक्षण सॉफ्टवेअर मधील अडचणी सोडविणे व नियमित ऑनलाईन प्रपत्रे भरण्यासाठीचे कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी मदत करणे.

२. ऑनलाईन प्रपत्रे भरण्यामध्ये काही अडचणी आल्यास त्या सोडवण्यासाठी संगणक प्रचालकाला फोनद्वारे सूचना देणे अथवा इंटरनेटद्वारे संपर्क साधून सदर लॅपटॉपमधील अडचणी सोडविणे.

३. वरीलप्रमाणे अडचणींचे निराकरण न झाल्यास संबंधित संगणक प्रचालकास लॅपटॉपसह विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयात बोलविणे व सदर अडचणीची तपासणी करणे. (सॉफ्टवेअर अथवा हार्डवेअर)

४. हार्डवेअरबाबत अडचण असल्यास जवळच्या एचसीएल डीलर यांचेशी संपर्क साधून ती अडचण सोडविणे (यासाठी विभाग स्तरावरून एचसीएल डीलर्सचे फोन नं. प्राप्त करुन घ्यावेत.) एचसीएल डिलरकडे लॅपटॉप हस्तांतरीत करतांना संगणक प्रचालकाकडून याबाबतची पोहोच घेणे.

५. लॅपटॉपच्या दुरूस्तीनंतर त्याची तपासणी करणे व सर्वेक्षणाबाबत ऑनलाईन प्रपत्रे भरण्याकरीताचे आवश्यक सॉफ्टवेअरचा त्यामध्ये अंतर्भाव करणे.

६. सॉफ्टवेअर संबंधित अडचण असल्यास त्याची दुरूस्ती करणे, सॉफ्टवेअरचे बाबतीत एनसीआयपीएम, नवी दिल्ली यांनी दिलेल्या प्रशिक्षणानूसार सदर सॉफ्टवेअर पुन्हा लॅपटॉपमध्ये स्थापित करणे व निराकरण न झाल्यास मदतीसाठी एनसीआयपीएम नवी दिल्ली यांच्या अधिका-यांशी संपर्क साधणे.

७. लॅपटॉपमधील ऑफिस सॉफ्टवेअर नादुरूस्त झाल्यास अथवा ऑनलाईन संगणक प्रणालीत बिघाड झाल्यास लॅपटॉप बरोबर दिलेल्या मूळ सीडीद्वारे दुरूस्ती करणे.

**८.६ संगणक ऑपरेटर (राज्यस्तरीय सनियंत्रण कक्ष):-** प्रकल्पांतर्गत ऑनलाईन भरलेल्या अहवालांची संकेतस्थळावरुन माहीती घेणे, विहीत प्रपत्रात माहितीचे संकलन करणे, विविध बैठकींसाठी आवश्यक माहीती तयार करणे यासाठी राज्यस्तरीय सनियंत्रण कक्षासाठी २ संगणक ऑपरेटर मंजुर असून त्यांना दरमहा रु. ५४००/- इतके मूळ मासिक वेतन तसेच इतर सेवा कर व सेवा आकारासह एकुण रू.१००२०/- (मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराच्या सेवा आकारासह) वेतन प्रस्तावीत आहे.

**शैक्षणिक अर्हता:** १. उमेदवार किमान कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
२. संगणकामधील एक वर्षाचा प्रमाणपत्र /पदविका अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा तसेच तो मराठी व इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण असावा.
३. वय २१ ते ४५ वर्षे

**सेवा कालावधी –** १ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ (अकरा महिने)

**८.६.१ कर्तव्य व जबाबदा-या :-**

१. संगणक ऑपरेटर हे कृषि उपसंचालक (फलो-३) यांचे अधिनस्त हॅार्टपसॅपचे काम करतील.
२. ऑनलाईन भरलेल्या अहवालांची संकेतस्थळावरुन माहीती घेणे व ज्या ठिकाणी अहवालांची संख्या ८० टक्केपेक्षा कमी असेल ती ठिकाणे कृषि उपसंचालक (फलो-३) यांचे निदर्शनास आणणे.
३. कृषि उपसंचालक (फलो-३) यांच्या मार्गदर्शनाखाली व संशोधन सहयोगी यांच्या मदतीने एनसीआयपीएम, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेत स्थळावर (वेब साईट) प्रकल्प संबंधीत पुरविलेल्या माहितीचे विहीत प्रपत्रात संकलन तयार ठेवणे तसेच अभिलेखांचे वर्गिकरण, व्यवस्थापन व जतन करण्याची जबाबदारी संगणक ऑपरेटर यांची असेल.
४. प्रकल्पांतर्गत उपविभागीय कृषि अधिकारी यांनी पाठविलेल्या एसएमएसच्या अहवालांची माहीती अद्ययावत ठेवणे, कृषि उपसंचालक (फलो-३) यांच्या मार्गदर्शनाखली व संशोधन सहयोगी यांच्या मदतीने क्षेत्रीय पातळीवर व सहभागी संस्थाना एसएमएस, ई-मेल व इतर माध्यमांद्वारे माहीती पाठविणे तसेच सहभागी संस्थांकडून आलेले पीक संरक्षण सल्ले क्षेत्रीय पातळीवर तसेच संबंधीतांना संगणकाधारीत संपर्क साधनांद्वारे अग्रेषित करण्याची जबाबदारी संगणक ऑपरेटर यांची असेल.
५. प्रकल्प संबंधीत सर्व पत्रव्यवहार व अहवालांचे टंकलेखन करणे.
६. संगणक/लॅपटॉप व इतर अनुषंगिक साहित्याची योग्य काळजी घेणे, यासंबधीत अनुषंगिक साहित्यांची दुरुस्ती व देखभालीबाबत कृषि उपसंचालक (फलो-३) व संशोधन सहयोगी यांना अवगत करुन आवश्यक ते मार्गदर्शन घेऊन पाठपुरावा करणे.
७. विविध बैठकींसाठी आवश्यक माहीतीचे संकलन व पॉवर पॉईंटद्वारे सादरीकरण तयार करणे.

**८.७ राज्यस्तरीय सनियंत्रण कक्षासाठी लेखापाल:** प्रकल्पांतर्गत सहभागी संस्थांना अनुदान वाटप करणे, त्याचा विहीत प्रपत्रात हिशेब ठेवणे, मासिक प्रगती अहवाल अद्ययावत ठेवणे, विविध बैठकींसाठी आवश्यक माहीती तयार करणे यासाठी राज्यस्तरीय सनियंत्रण कक्षासाठी एक लेखापाल दरमहा रु. ६७५०/- इतके मूळ मासिक वेतन तसेच इतर सेवा कर व सेवा आकारासह एकुण रू. १२२५०/- (मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराच्या सेवा आकारासह) वेतन प्रस्तावीत आहे.

**शैक्षणिक अर्हता:** १. उमेदवार किमान वाणिज्य शाखेचा पदवीधर असावा. तथापि, वाणिज्य शाखेच्या पदव्युत्तर पदवीधरास प्रधान्य देण्यात यावे.
२. उमेदवार महाराष्ट्र ज्ञानमंडळाचा एम.एस.सी.आय.टी. संगणक प्रमाणपत्र धारक असावा. तसेच तो मराठी व इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण असावा.
३. वय २१ ते ४५ वर्षे

**सेवा कालावधी -** ०१ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ (अकरा महिने)

**८.७.१ कर्तव्य व जबाबदा-या :-**

१. लेखापाल हे कृषि उपसंचालक (फलो-३) यांचे अधिनस्त काम करतील.
२. प्रकल्पांतर्गत सहभागी संस्थांना अनुदान वाटप करणे, त्याचा विहीत प्रपत्रात हिशेब ठेवणे, त्याचबरोबर मासिक प्रगती अहवाल अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी लेखापाल यांची असेल.

३. अनुदान वाटपाबाबत लेखा शाखेकडे पाठपुरावा करणे.
४. सहभागी संस्था तसेच क्षेत्रीय पातळीवरील अनुदान संबंधीत पत्रव्यवहार करणे.
५. प्रकल्पाचे उपयोगिता प्रमाणपत्र तयार करणे.
६. विविध बैठकींसाठी आवश्यक माहीती तयार करणे.
७. अनुदान संबंधीत कार्यालयीन अभिलेखांचे देखभाल व जतन करणे.

**८.८ संशोधन सहयोगी :** (पदव्युत्तर पदवीधारक उमेदवार रु. ३८०००/- प्रती महिना अधिक घरभाडे अथवा पीएचडी उमेदवार रु. ४००००/- प्रती महिना प्रती कर्मचारी अधिक घरभाडे) राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र-नवी दिल्ली-२, राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र-तिरुचिरापल्ली-१, राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र-सोलापूर-२, राष्ट्रीय लिंबुवर्गीय संशोधन केंद्र-नागपूर-१, केळी संशोधन केंद्र-जळगाव-१, फळसंशोधन केंद्र-वेंगुर्ला-१, चिक्कू संशोधन केंद्र-पालघर-१, महात्मा फुले कृषि विद्यापीठ-राहुरी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ-दापोली, मराठवाडा कृषि विद्यापीठ-परभणी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ-अकोला प्रती २ संशोधन सहयोगी (किटकशास्त्र व वनस्पती रोगशास्त्र) व राज्य कृषि विभागासाठी १ संशोधन सहयोगी याप्रमाणे संशोधन सहयोगी राहतील. राज्य कृषि विभागासाठी आवश्यक संशोधन सहयोगीची निवड महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी करावी व त्याप्रमाणे सेवा कृषि विभागास उपलब्ध करुन द्यावी.

**शैक्षणिक अर्हता :** भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांनी निश्चित केलेल्या किमान अर्हतेनुसार कृषि किटकशास्त्र किंवा वनस्पती रोगशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी.

**सेवा कालावधी -** ०१ जुलै २०१६ ते ३० जून २०१७ (बारा महिने)

**८.८.१ कर्तव्य व जबाबदा-या :-**

१. तालुकानिहाय ऑनलाईन संकेतस्थळावर भरण्यात आलेल्या कीड / रोग सर्वेक्षण अहवालावर आधारित माहितीचे विश्लेषण करणे व कीड / रोगाचे तालुकानिहाय एसएमएस साठी तसेच जाहिर निवेदनासाठीचे सल्ले व उपाययोजना ऑनलाईन संकेतस्थळावर आठवड्यातून दोन वेळा (दर सोमवार व गुरुवार) उपलब्ध करुन देणे. आर्थिक नुकसान संकेत पातळीवरील गावात करावयांच्या उपाययोजनांबाबत संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी यांना इशारा (Alert) देऊन कळविणे.
२. कीड रोगाचे तिव्रतेचे सनियंत्रण ऑनलाईन अहवालावरुन करणे. कीड रोगाचे तिव्रतेवर लक्ष ठेवून तीव्रता वाढणा-या व वाढलेल्या ठिकाणी भेटी देऊन कारणमिमांसा तपासणे, उपाययोजना सुचविणे व कीड रोग स्थितीबाबत विहित प्रपत्रातील माहिती संकेतस्थळावर भरणे.
३. संस्था व विद्यापीठ स्तरावरील संशोधन सहयोगी यांनी कीड रोगांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान संकेत पातळीजवळ अथवा आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या वर गेलेल्या गावात (Hotspot) आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रिय भेटी देऊन कीड रोग स्थितीबाबत विहित प्रपत्रातील माहिती संकेतस्थळावर भरणे. त्यादृष्टीने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व जिल्ह्यात क्षेत्रिय भेटीचे नियोजन करावे.
४. कीड रोग सर्वेक्षण, सल्ला प्रकल्प अंमलबजावणी व सल्ल्याबाबत कृषि उपसंचालक, फलो-३, कृषि आयुक्तालय, पुणे-५ आणि उपविभागीय कृषि अधिकारी व सहभागी संस्था यांचेमध्ये समन्वय साधणे.
५. ऑनलाईन माहिती आधारे आठवड्यातील कीड रोगाच्या स्थितीचा अहवाल तयार करणे. आर्थिक नुकसान पातळीच्या जवळ व त्यावरील गावांबाबत कृषि आयुक्तालयास अवगत करणे.
६. पीक संरक्षणाबाबत विविध प्रसार माध्यमांद्वारे प्रसिद्धीस द्यावयाची तांत्रिक माहिती तयार करणे.
७. प्रकल्पाधारित माहितीवर विभागनिहाय शोधनिबंध प्रकाशित करणे. तसेच फळपिकावरील कीड रोग व्यवस्थापनाच्या दृष्टीने क्षेत्र व पिकनिहाय पीक संरक्षण सल्ला व मोड्युलस् तयार करणे.
८. जिल्हानिहाय कृषि विभागातील मास्टर ट्रेनर्स, कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक यांना हंगामपुर्व व हंगामात प्रशिक्षण देण्याकरीता विभाग प्रमुख, कृषि वनस्पती रोगशास्त्र विभाग यांना सहाय्य करणे.
९. आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांसाठी एकात्मिक कीड व्यवस्थपनावर आधारित पीक संरक्षण पद्धती तयार करणे, सल्ला देणे.
१०. जिल्हानिहाय कीड रोग सर्वेक्षणाबाबत कृषि विद्यापीठाचे जिल्हा समन्वयकांचेमार्फत संपर्क ठेवून वेळोवेळी आढावा घेण्याकरीता विभाग प्रमुख, कृषि वनस्पती रोगशास्त्र विभाग यांना सहाय्य करणे.

११. भविष्यात उद्भवणा-या कीड रोगांवर संशोधन करण्यासाठी माहिती संकलित करणे व एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धती तयार करण्यासाठी शेतक-यांकडून माहिती घेणे.

१२. प्रकल्पामधील आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, मोसंबी व चिक्कू या पिकांचे सर्वेक्षण उपाययोजना व संशोधनात्मक बाबींवर अहवाल देणे.

१३. कीड रोगांबाबत ऑनलाईन अहवालानुसार विश्लेषण करुन आगामी पीक हंगामाकरीता आवश्यक उपाययोजनांबाबत कृषि आयुक्तालयास वार्षिक प्रकल्प अहवाल सादर करणे.

**९. प्रकल्पांतर्गत उपलब्ध करुन घेतलेल्या मनुष्यबळाचे सनियंत्रण, त्यांच्या सेवांचे नियमन व वेतन वितरण कार्यपद्धतीः-**

९.१. **निवड प्रक्रियाः-** कीड सर्वेक्षक, संगणक प्रचालक, संगणक प्रणाली मदतनीस, लेखापाल यांच्या सेवा उपलब्ध करुन घेणेसाठी विभागीय स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक यांनी मुद्दा क्र. ८ मध्ये नमूद केल्यानुसार विहित पद्धतीने निविदा प्रक्रिया पार पाडावी. त्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी यांचेकडे कंत्राटी कामगार (नियंत्रण आणि निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत प्रिन्सिपल ऍम्पलॉयर म्हणून नोंदणी अद्ययावत करावी.

९.२. कीड सर्वेक्षक, संगणक प्रचालक, संगणक प्रणाली मदतनीस, संशोधन सहयोगी, लेखापाल या पदांसाठी मनुष्यबळ प्राप्त करुन घेण्यासाठी निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी व त्यांच्या योग्यतेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

| अ. क्र. | पदाचे नांव | मनुष्यबळ उपलब्धता प्रक्रिया राबविणे | संबंधित पदासाठी उमेदवारांची योग्यता ठरविणारे अधिकारी/ संस्था | कामाचे ठिकाण निश्चित करणे |
|---|---|---|---|---|
| १ | कीड सर्वेक्षक | वि.कृ.सहसंचालक | वि.कृ.सहसंचालक | वि.कृ.सहसंचालक |
| २ | संगणक प्रचालक | वि.कृ.सहसंचालक | वि.कृ.सहसंचालक | वि.कृ.सहसंचालक |
| ३ | संगणक प्रणाली मदतनीस | वि.कृ.सहसंचालक | वि.कृ.सहसंचालक | वि.कृ.सहसंचालक |
| ४ | राज्यस्तरीय सनियंत्रण कक्षासाठी संगणक ऑपरेटर | वि.कृ.सहसंचालक पुणे | वि.कृ.सहसंचालक पुणे | संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे |
| ५ | राज्यस्तरीय सनियंत्रण कक्षासाठी लेखापाल | वि.कृ.सहसंचालक पुणे | वि.कृ.सहसंचालक पुणे | संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे |
| ६ | संशोधन सहयोगी (राज्यस्तरीय संनियंत्रण कक्ष) | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे |
| ७ | संशोधन सहयोगी (संस्था / कृषि विद्यापीठ स्तर) | संबंधित संस्था / संबंधित कृषि विद्यापीठ | संबंधित संस्था/ संबंधित कृषि विद्यापीठ | संबंधित संस्था / संबंधित कृषि विद्यापीठ |
| ८ | संगणक ऑपरेटर (संस्था / कृषि विद्यापीठ स्तर) | संबंधित संस्था / संबंधित कृषि विद्यापीठ | संबंधित संस्था / संबंधित कृषि विद्यापीठ | संबंधित संस्था / संबंधित कृषि विद्यापीठ |

९.३. **वेतन वितरण कार्यपद्धतीः-**

९.३.१. कीड सर्वेक्षक, संगणक प्रचालक, संगणक प्रणाली मदतनीस, लेखापाल यांची योग्यता तपासल्यानंतर त्यांचे करीता मुद्दा क्र. ७.१ नुसार कृषि विद्यापीठ स्तरावर आयोजित केलेल्या दोन दिवसाच्या तांत्रिक प्रशिक्षणास उपस्थित राहणेसाठी त्यांना वेतन/भत्ता देय राहणार नाही.

९.३.२. कीड सर्वेक्षक व संगणक प्रचालक यांच्या कामाबाबतचा अहवाल व उपस्थिती याबाबतची माहिती कृषि पर्यवेक्षक संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करतील.

९.३.३. उपविभागीय कृषि अधिकारी हे कीड सर्वेक्षक व संगणक प्रचालक यांना नेमुण दिलेले काम व उपस्थितीनुसार संबंधीतांचे वेतन अदा करण्याबाबत हजेरीपत्रकासह अहवाल तयार करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना दर महिन्याच्या तीन तारखेपर्यंत सादर करतील. कृषि उपसंचालक फलो-३ (पिक संरक्षण) हे कृषि आयुक्तालय स्तरावरील लेखापाल व संगणक प्रचालक यांचा

उपस्थितीचा अहवाल विभागीय कृषि सहसंचालक, पुणे तसेच संशोधन सहयोगी यांचा उपस्थितीचा अहवाल महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना दर महिन्याच्या तीन तारखेपर्यंत पाठवतील.

९.३.४. मनुष्यबळाच्या सेवा पुरवठादार संबंधीत कामगारांचा त्यांचे स्तरावर स्वतंत्र उपस्थिती अहवाल ठेवतील. सदर उपस्थिती अहवाल तसेच मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक/हजेरीपत्रक (Muster Roll Cum Wage Register), कामगारांचे वेतन देयक (शासकीय वजावटीच्या तपशिलासह) व मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराचे सेवा आकाराचे देयक अशी दोन स्वतंत्र देयके जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना दर महिन्याच्या एक तारखेस सादर करतील. तसेच, त्याच्या मागील महिन्यात त्यांचेकडील कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा, सेवा कर, व्यवसाय कर व इतर शासकीय नियमाप्रमाणे देय रकमा शासनास चलनाद्वारे भरलेल्या चलनाच्या प्रमाणित प्रती व मागील महिन्यात मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक/हजेरीपत्रकानुसार (Muster Roll Cum Wage Register) संबंधीत कर्मचा-यांना मिळालेल्या वेतनाची संबंधीत कर्मचा-यांची स्वाक्षरी असलेली प्रमाणित प्रत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना दर महिन्याच्या एक तारखेस सादर करतील.

९.३.५. उपविभागीय कृषि अधिकारी यांचा अहवाल व हजेरीपत्रक याच्या अधारे मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून सादर करण्यात आलेला उपस्थिती अहवाल, पगारपत्रक/हजेरीपत्रक व देयाकांचीही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तपासणी करतील.

९.३.६. सेवा पुरवठादार ठेकेदाराने मागील महिन्यात त्यांचेकडील संबंधीत कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा, सेवा कर व इतर शासकीय नियमाप्रमाणे देय रकमा शासनास चलनाद्वारे भरल्याची जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी खात्री करतील त्याचबरोबर संबंधीत कर्मचा-यांना ठेकेदाराने सादर केलेल्या पगारपत्रक/हजेरीपत्रकानुसार वेतन मिळत असल्याबाबत खात्री करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी विहीत लेखा कार्यपद्धती तसेच, निर्धारीत अटी व शर्तीच्या अधीन राहून संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास दर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत देयके अदा करतील. याबाबतच्या कार्यवाहीची संपूर्ण जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल.

**कीड सर्वेक्षक/कृषि पर्यवेक्षक यांच्या साप्ताहिक दौ-याचा कार्यक्रम-**

**उपविभागः-** **जिल्हाः-**

| अ. क्र. | कृषि पर्यवेक्षक/ कीड सर्वेक्षकाचे नाव | मुख्यालय | दुरध्वनी क्रमांक | गावाचे नाव व सर्वेक्षणाची सर्वसाधारण वेळ | सोमवार | | मंगळवार | | गुरुवार | | शुक्रवार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | गाव क्र.१ | गाव क्र.२ | गाव क्र.३ | गाव क्र.४ | गाव क्र.५ | गाव क्र.६ | गाव क्र.७ | गाव क्र.८ |
| १ | | | | गावाचे नाव | | | | | | | | |
| | | | | वेळ | | | | | | | | |
| २ | | | | गावाचे नाव | | | | | | | | |
| | | | | वेळ | | | | | | | | |

(प्रथमतः कृषि पर्यवेक्षक व त्यानंतर त्यांचे अधिनस्त कीड सर्वेक्षक याप्रमाणे एकाच प्रपत्रात यादी तयार करावी.)

९.४. **सर्वेक्षण चमूचे पर्यवेक्षण व सनियंत्रणः-** प्रकल्पांतर्गत नियुक्त कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांकडून योग्य प्रकारे सर्वेक्षण होण्यासाठी त्यांचेवर देखरेख ठेवणे जरूरी आहे. याकरीता प्रत्येक उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून त्यांच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेले कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक मुख्यालयी हजर असलेबाबत खात्री करावी तसेच कीड रोग सर्वेक्षणाचे काम तांत्रिक दृष्ट्या योग्य प्रकारे होत असल्याबाबतची तपासणी करावी. सदर तपासणी ज्या दिवशी कीड सर्वेक्षक/कृषि पर्यवेक्षकाने निरीक्षणे घेतली आहेत त्याच दिवशी करुन व याबाबतचा अहवाल पुढील प्रपत्रात दर आठ दिवसांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व संचालक फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, यांना hortplantprotection@rediffmail.com या ई-मेलवर सादर करावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या दौ-यामध्ये निरिक्षणाच्या नोंदींची जाणीवपुर्वक तपासणी करावी तसेच अधिनस्त उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडील तपासणी अहवालाबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. कीड सर्वेक्षक व कृषि

पर्यवेक्षक मुख्यालयी हजर नसल्यास तसेच त्यांनी घेतलेले निष्कर्ष व तपासणीमध्ये तफावत दिसून आल्यास त्याबाबत सविस्तर अहवाल त्याच्या अभिप्रायसह विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करावा. कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक त्यांना नेमून दिलेल्या कर्तव्य व जबाबदारीमध्ये वारंवार कसूर करत असल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी संबंधीत ठेकेदाराकडून तात्काळ कीड सर्वेक्षक बदलून घेतील तर कृषि पर्यवेक्षकांचे बाबत कामामध्ये त्यांनी स्वतः कसूर केल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

**उपविभागाचे नाव :** **कालावधी : / /२०१ ते / /२०१**

| अ.क्र | तपशील | कीड सर्वेक्षक | कृषि पर्यवेक्षक |
|---|---|---|---|
| १ | आठवडा निहाय सर्वेक्षण केलेल्या रॅन्डम व फिक्स प्लॉटची संख्या | | |
| २ | उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तपासणी केलेल्या रॅन्डम व फिक्स प्लॉटची संख्या | | |
| ३ | तपासणी निष्कर्ष | | |

## ९.५. कृषि विद्यान केंद्र (केव्हीके) यांचेमार्फत कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांच्या कामावर देखरेखः-

९.५.१. कृषि विज्ञान केंद्र (केव्हीके) यांचेमार्फतही प्रकल्पांतर्गत नियुक्त कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांच्या कामावर देखरेख ठेवण्यात यावी.

९.५.२. सदर कृषि विज्ञान केंद्रांनी प्रत्येक आठवडयातील एका दिवसात जिल्ह्यातील कार्यरत कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक मुख्यालयी हजर असलेबाबत खात्री करावी, त्यांचेकडून कीड/रोग सर्वेक्षणाचे काम तांत्रिक दृष्ट्या योग्य प्रकारे होत असल्याबाबतची तपासणी करावी.

९.५.३. कीड रोग सर्वेक्षणाबाबत कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांना मार्गदर्शन करावे व याबाबत विहीत प्रपत्रातील अहवाल जिल्हा मुख्यालयस्थित उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी सदर अहवाल एनसीआयपीएम, नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या संगणक प्रणालीवर नोंदवावा तसेच सदर अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे निदर्शनास आणावा.

९.५.४. कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक त्यांना नेमून दिलेल्या कर्तव्य व जबाबदारीमध्ये वारंवार कसूर करत असल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी संबंधीत ठेकेदाराकडून कीड सर्वेक्षक बदलून घेतील तर कृषि पर्यवेक्षकांचे बाबत कामामध्ये कसूर केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करतील.

## ९.६. सर्वेक्षण कालावधीनिहाय नेमणूकीतील फेरबदल व सेवा समाप्तीः-

९.६.१ डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांकरीता नियुक्त करण्यात आलेल्या कीड सर्वेक्षक, कृषि पर्यवेक्षक व संगणक प्रचालक यांचेकडून १५ जुलै २०१६ ते ३१ मे २०१७ पर्यंत व आंबा या पिकाकरीता १५ नोव्हेंबर २०१६ ते ३१ मे २०१७ पर्यंत सर्वेक्षण करण्यात यावे. या पिकांसाठी नियुक्त केलेल्या सर्वेक्षण चमूकडील सर्वेक्षण साहित्य दिनांक ३१ मे २०१७ पर्यंत उपविभागस्तरावर जमा करुन सर्वेक्षण चमूस कार्यमुक्त करण्यात यावे.

९.६.२ सर्वेक्षणासाठी नियुक्त केलेल्या कृषि पर्यवेक्षकांकडून आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू पिकांकरीता कीड रोग पुर्व इतिहास पुस्तिका दिनांक ३१ मे २०१७ पर्यंत तयार करुन दहा दिवसाचे आत उपविभागीय कृषि अधिकारी यांनी कृषि आयुक्तालयास सादर करावी.

९.६.३ ज्याठिकाणी आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू अंतर्गत कार्यरत असलेल्या कीड सर्वेक्षक, संगणक प्रचालक व कृषि पर्यवेक्षकांच्या व्यतिरीक्त अतिरीक्त कर्मचा-यांची आवश्यकता असेल त्याठिकाणी संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक आवश्यक असणा-या कर्मचा-यांच्या उपलब्धतेबाबत नियोजन करतील व नियोजित वेळी सदर कर्मचारी हजर होतील असे पहावे. नवीन नियुक्त होणा-या कर्मचा-यांस आवश्यकतेप्रमाणे सर्वेक्षणाच्या दिनांकापुर्वी १५ दिवस आधी प्रशिक्षीत करण्यात यावे.

## १० कीड नियंत्रण चमूसाठी कीड सर्वेक्षण साहित्याची उपलब्धता :-

१०.१ विभागीय कृषि सहसंचालक यांनी सर्वेक्षण साहित्याचा आढावा घेऊन सन २०१६-१७ मध्ये राबवावयाच्या पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पातील कीड सर्वेक्षक, कृषि पर्यवेक्षक व संगणक प्रचालक यांना आवश्यकतेनुसार सदर प्रकल्पाच्या आकस्मिक निधीतून कीड सर्वेक्षकांसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करावे.

१०.२ आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू या प्रकल्पाअंतर्गत कीड सर्वेक्षक, कृषि पर्यवेक्षक व संगणक प्रचालक यांच्या सर्वेक्षण साहित्यामध्ये सर्वेक्षण किट (भिंग, किटक जमा करण्याच्या डब्या, निडल), लॅपटॉप, पेनड्राईव्ह इत्यादि बाबींचा समावेश असेल.

## ११ आपत्कालीन परिस्थितीत आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिकू या पिकांवरील कीड रोगांच्या व्यवस्थापनासाठी पीक संरक्षण घटकांची उपलब्धता:-

आपत्कालीन परिस्थितीत एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी वापरावयाच्या निवीष्ठांकरीता ऑनलॉईन संगणक प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या शिफारसीच्या आधारे व कृषि विद्यापीठांकडील जिल्हा समन्वयक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी शिफारस केल्यानुसार एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या जैविक/रासायनिक बाबी/घटक गरजेनुरूप निर्धारीत करण्यात याव्यात. त्यानुसार आवश्यक तो पुरवठा ५० टक्के अनुदान व जास्तीत जास्त रु. ७५०/- प्रति हेक्टर मर्यादेत शेतक-यांना करण्यात यावा.

आपत्कालीन परिस्थितीत कीड/रोग नियंत्रणासाठीच्या निवीष्ठांची खरेदी, पुरवठा व सनियंत्रण संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांनी करावा. सदरचा पुरवठा आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांकरीता स्थानिक गरज व कीड रोगाची तीव्रता विचारात घेऊन आवश्यक असलेल्या ठिकाणी करण्यात यावा. या योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या अर्थसहाय्याचा वापर करुन आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांवर येणा-या सर्व प्रकारच्या कीड व रोगांच्या व्यवस्थापनासाठी करण्यात यावा.

आपत्कालीन परीस्थितीमध्ये आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या वरील कीड-रोग प्रादुर्भावग्रस्त क्षेत्राची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असल्यास वरीलप्रमाणे आपत्कालीन निविष्ठांचा वापर करण्यात यावा. त्याचबरोबर त्या ठिकाणी राज्य पुरस्कृत पिक संरक्षण कार्यक्रम / राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत एकात्मिक किड व्यवस्थापन कार्यक्रम इत्यादी योजनांमधील एकात्मिक किड व्यवस्थापनासाठी तरतूद असलेल्या पिक संरक्षण निविष्ठांचा वापर करुन सदर प्रादुर्भावग्रस्त क्षेत्र आर्थिक नुकसान संकेतपातळीच्या खाली ठेवण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात यावी.

आपत्कालिन निविष्ठांचा लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर पुरवठा करावयाचा आहे. क्षेत्रिय कर्मचा-यांनी अनुदान वजा जाता लाभार्थी हिस्स्याची रक्कम कोणत्याही परिस्थितीत रोख स्वरुपात गोळा करु नये. याबाबत सद्यस्थितीत गाव पातळीवर कार्यरत असलेल्या नोंदणीकृत विविध शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषि विज्ञान मंडळे, शेतकरी स्वयंसहाय्यता गट, शेतकरी बचतगट इत्यादीमार्फत त्यांच्या शेतकरी सभासद व इतर शेतक-यांना निविष्ठांचा पुरवठा करावा.

लाभार्थीने लाभार्थी हिस्स्याची रक्कम संबंधीत शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषि विज्ञान मंडळे, शेतकरी स्वयंसहाय्यता गट, शेतकरी बचत गटाकडे जमा करावी. संबधीत गट प्रमुखाने लाभार्थी हिस्स्याच्या एकुण रकमेचा धनादेश / धनाकर्ष निविष्ठा पुरवठादार संस्थेच्या नावे काढून तो संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करावा. तालुका कृषि अधिकारी यांनी सदर धनादेश / धनाकर्ष संबंधीत निविष्ठा पुरवठादार संस्थेस पाठवावा.

## १२ प्रकल्प सनियंत्रण कार्यपध्दती :

या प्रकल्पातील सर्वेक्षणाद्वारे प्राप्त होणा-या निरीक्षणांवर आधारीत तालुकानिहाय व जिल्हानिहाय विश्लेषण करुन आवश्यक त्या उपाययोजना अत्यंत तातडीने हाती घेणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे कीड व्यवस्थापनासाठी सनियंत्रण कार्यपध्दती निर्धारीत करण्यात आली आहे.

१२.१ **कृषि आयुक्तालय स्तर :-** कृषि आयुक्तालय स्तरावरुन कृषि उपसंचालक, (फलो-३) हे प्राप्त निरीक्षणांच्या आधारे विश्लेषण करतील व जिल्हानिहाय विश्लेषण संबंधित विभागीय कृषि सहसंचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना ई-मेल द्वारे पाठवतील. ज्या ठिकाणी कीड-रोगांची तीव्रता आर्थिक नुकसान संकेत पातळीच्यावर दिसून येईल त्या ठिकाणी तालुकानिहाय विश्लेषण कृषि आयुक्तालयामार्फत

पाठविण्यात येईल. राज्यातील पिकांवरील कीडींची तीव्रता आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या खाली राहण्यासाठी कृषि सहसंचालक (फलोत्पादन) हे संबंधित विभागीय कृषि सहसंचालकांकडे वेळोवेळी पाठपुरावा करुन आढावा घेतील.

१२.२ **विभागस्तर :-** विभागीय स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक हे प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी या बाबत आढावा घेवून संनियंत्रण करतील. ऑनलाईन विश्लेषणाप्रमाणे प्राप्त ॲडव्हायझरीनुसार करावयाच्या आवश्यक त्या उपाययोजना युध्दपातळीवर मोहिम स्वरुपात राबवतील. तसेच ज्या ठिकाणी कीड रोगाची परिस्थिती आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या वर असेल अशा परिस्थितीत वेळच्या वेळी पाठपुरावा करुन विभागातील कीड रोगांच्या नियंत्रणासाठी उपाययोजना, नियोजन व अंमलबजावणी करुन कीड रोगांची तिव्रता आर्थिक नुकसान संकेत पातळीचे खाली ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक यांची राहील.

आपत्कालीन परिस्थितीत कीड रोग नियंत्रणासाठीच्या निवीष्ठांच्या खरेदी, पुरवठा व नियंत्रण संबंधित विभागीय कृषि सहसंचालक करतील. आपत्कालीन परीस्थितीमध्ये आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या वरील कीड-रोग प्रदुर्भावग्रस्त क्षेत्राची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असल्यास आपत्कालीन परिस्थितीतील उपलब्ध करुन दिलेल्या पीक संरक्षण निविष्ठांसह राज्य पुरस्कृत पिक संरक्षण कार्यक्रम / राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत एकात्मिक किड व्यवस्थापन कार्यक्रम इत्यादी योजनांमधील एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी तरतूद असलेल्या पीक संरक्षण निविष्ठंाचा वापर करुन सदर प्रादुर्भावग्रस्त क्षेत्र आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या खाली आणण्याकरीता नियोजन व सनियंत्रण संबंधित विभागीय कृषि सहसंचालक करतील. विभागातील कीड रोग स्थितीबाबतची आकडेवारीसह माहिती रेडिओ,आकाशवाणी, वृत्तपत्रे तसेच इतर माध्यमांद्वारे प्रसिध्दीस देण्याची जबाबदारी विभागीय कृषि सहसंचालक यांची राहील.

विभागीय स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक यांचे अध्यक्षतेखाली विभागातील सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची विभागीय प्रकल्प सनियंत्रण समिती स्थापन करण्यात यावी. विभागीय कृषि सहसंचालक यांचे कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी हे या समितीचे सदस्य सचिव असतील. या समितीची प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात बैठक घेण्यात यावी. सदर बैठकीमध्ये प्रकल्पाच्या प्रगतीबाबत आढावा घेण्यात यावा व बैठकीच्या इतिवृत्ताबरोबर प्रकल्पाचा जिल्हानिहाय भौतिक, आर्थिक, लक्ष व साध्य याबाबतचा मासिक प्रगती अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्यात यावा.

१२.३ **जिल्हास्तर:-** जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरावर नव्याने स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय किड/रोग सर्वेक्षण, निदान व सल्लागार पथक यांचे मार्फत दर महिन्याला आढावा घ्यावा व जनजागृती प्रशिक्षणाचे नियोजन करावे. ज्या ठिकाणी कीड रोगांची तिव्रता वाढलेली आहे त्याठिकाणी कीड रोग नियंत्रणाची मोहिम राबविण्याची व कीड रोगांची तिव्रता आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या खाली आणण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांची राहील. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे त्यांच्या जिल्हयातील या प्रकल्पाचे संपूर्ण संनियंत्रण त्यांचे कार्यालयातील कृषि उपसंचालकांमार्फत करतील.

कृषि उपसंचालक दर पंधरवडयास ऑनलाईन अहवाल नोंदणी, कृषि विद्यापीठाकडून प्राप्त होणा-या ॲडव्हायजरी, एसएमएसद्वारे द्यावयाचे शेतकरी संदेश, अहवालानुसार कीड-रोग परिस्थिती, कीड रोगाबाबत आर्थिक नुकसान संकेत पातळीच्यावर गेलेली गावे/तालुके, कीड रोगाबाबत आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली गांवे/ तालुके याबाबत केलेल्या निविष्ठांच्या पुरवठयाबाबतचे नियोजन, प्रसिध्दीबाबत केलेली कार्यवाही, संगणक प्रणाली, मनुष्यबळाच्या क्षेत्रिय कामाबाबत व त्यांच्या मानधन वितरणाबाबतच्या अडचणींच्या निराकरणाबाबत केलेली कार्यवाहीचा वस्तुस्थिती अहवाल (Fact sheet) तसेच प्रकल्पाच्या भौतिक-आर्थिक, लक्ष-साध्य प्रगतीबाबत मासिक अहवाल तयार करुन विभागीय प्रकल्प सनियंत्रण समितीच्या बैठकीस व कृषि आयुक्तालयास सादर करतील.

## कृषि उपसंचालक (जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालय) यांनी सादर करावयाचा पाक्षिक वस्तुस्थिती अहवाल (Fact sheet)

**विभाग:-** **जिल्हा :-** **अहवालाचा कालावधी :-**

| अ.क्र | तपशिल | | केलेल्या कार्यवाहीची माहिती |
|---|---|---|---|
| १ | कीड सर्वेक्षकांच्या ऑनलाईन नोंदणी केलेल्या सर्वेक्षण अहवालांची पाक्षिक संख्या | | |
| २ | कृषि पर्यवेक्षकांच्या ऑनलाईन नोंदणी केलेल्या सर्वेक्षण अहवालांची पाक्षिक संख्या | | |
| ३ | कृषि विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या तालुकानिहाय ॲडव्हायजरींची पाक्षिक संख्या. | | |
| ४ | प्रत्येक तालुक्यासाठी संबंधीत पंधरवड्यासाठी आठवडयातून दोन वेळा ॲडव्हायजरी प्राप्त झाली आहे काय? नसल्यास तालुक्याचे नांव, कालावधी व कारण. | | |
| ५ | एसएमएसव्दारे ॲडव्हायजरी देण्यासाठी नोंदवलेल्या शेतक-यांची संख्या. | | |
| ६ | शेतक-यांना पाठवलेल्या पाक्षिक ॲडव्हायजरी एमएमएसची संख्या. | | |
| ७ | विविध प्रसिध्दी माध्यमांव्दारे प्रसारीत केलेल्या पाक्षिक ॲडव्हायजरींची संख्या. | | |
| | अ) | आकाशवाणी | |
| | ब) | दूरदर्शन / खाजगी वाहिन्या | |
| | क) | वृत्तपत्रे | |
| | ड) | पत्रकार परिषद | |
| | इ) | मेळावे/ इतर | |
| ८ | प्रगतशील शेतक-यांच्या मदतीने किती गावांत साप्ताहिक बैठका घेतल्या जातात? | | |
| ९ | संबंधीत पंधरवड्यात घेण्यात आलेल्या साप्ताहिक गांव बैठकांची संख्या. | | |
| १० | संबंधीत पंधरवड्यात कीड रोगामुळे आर्थिक नुकसान संकेत पातळीच्यावर गेलेल्या गावांची व तालुक्यांची संख्या. | | |
| ११ | संबंधीत पंधरवड्यात कीड रोग परिस्थिती आर्थिक नुकसान पातळीच्याखाली ठेवण्यासाठी केलेली कार्यवाही. | | |
| १२ | संबंधीत पंधरवड्यात कीड रोगामुळे आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवली आहे काय? असल्यास या परिस्थितीत पीक संरक्षण निविष्ठांचा पुरवठा करण्यात आला आहे काय? तसेच, पीक संरक्षण निविष्ठांबाबत केलेले नियोजन. | | |
| १३ | मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून त्याच्यामार्फत नियुक्त कामगारांना वेतन वेळेवर दिले जाते काय? नसल्यास कारण व निराकरणाबाबत केलेली कार्यवाही | | |
| १४ | मनुष्यबळाच्या क्षेत्रिय कामाबाबत व संगणक प्रणालीबाबत अडचणी आहेत काय? असल्यास निराकरणाबाबत केलेली कार्यवाही. | | |

१२.४ **उपविभागस्तर :- या प्रकल्पाची संपूर्ण क्षेत्रीय स्तरावरील कार्यन्वयनाची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील.** त्यांचे कार्यक्षेत्रातील सोबतचे प्रपत्रानुसार उपलब्ध असलेल्या कीड सर्वेक्षक, कृषि पर्यवेक्षक, संगणक प्रचालक यांचे मदतीने संपूर्ण प्रकल्पाचे वेळच्या वेळी योग्य नियोजन करुन सर्वेक्षण, उपाययोजना सल्ला, नियोजन, अंमलबजावणी व संनियत्रण करतील. प्रकल्पांतर्गत नियुक्त कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांकडून योग्य प्रकारे सर्वेक्षण होण्यासाठी त्यांचेवर देखरेख ठेवणे तसेच ते मुख्यालयी हजर असलेबाबत खात्री करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. उपविभागीय कृषि अधिकारी प्रत्येक आठवडयासाठी तालुकानिहाय ऑनलाईन ॲडव्हायझरीचा एसएमएस तालुका कृषि अधिकारी यांना करतील. प्रत्येक आठवडयामध्ये शेतकरी व तालुका कृषि अधिका-यांना दोन वेळा एसएमएसद्वारे ॲडव्हायजरी देणे, या ॲडव्हायजरी रेडीओ, आकाशवाणी, वृत्तपत्रात निवेदनाद्वारे प्रसिध्दीस देण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी आणि एकूणच यश उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या नियोजन आणि प्रत्यक्ष कामावर अवलंबून आहे. त्या दृष्टीने उपविभागीय कृषि अधिकारी यांची भूमिका अत्यंत महत्वाची राहील.

१२.५ **तालुकास्तर :-** या प्रकल्पांतर्गत कृषि विभागाच्या क्षेत्रिय कर्मचा-यांनी प्रगतशील शेतक-यांच्या मदतीने आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू पिक घेणा-या प्रत्येक गावामध्ये दहा याप्रमाणे साप्ताहिक बैठकांचे नियोजन व अंमलबजावणी करणे तसेच उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून आठवडानिहाय ऑनलाईन सर्वेक्षणावर आधारीत प्राप्त झालेल्या ॲडव्हायजरीच्या मराठी भाषेतील जम्बो झेरॉक्स करुन प्रत्येक गावातील कृषि वार्ता फलकावर तसेच कृषि सेवा केंद्राच्या नोटीस बोर्डवर वेळोवेळी लावल्या जातील याकडे व्यक्तिशः लक्ष देण्याची संपुर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील. उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून ॲडव्हाजरीचा एसएमएस प्राप्त करुन घेणे व सदर एसएमएसच्या मराठी भाषेतील जम्बो झेरॉक्स प्रती तयार करुन तालुक्यातील प्रत्येक गावातील कृषि वार्ताफलकावर तसेच कृषिसेवा केंद्रांवर लावण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी व त्यांचे अधिनस्त मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक यांची राहील. तसेच ज्या ठिकाणी कीड रोगांची तीव्रता वाढलेली आहे त्याठिकाणी कीड रोग नियंत्रणाची मोहिम राबविण्याकरिता आपत्कालीन परिस्थितीत पुरवठा करण्यात आलेल्या निविष्ठा शेतक-यांना वेळीच उपलब्ध करुन कीड रोगांची तीव्रता आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या खाली आणण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

## १३ लेखाविषयक :-

या प्रकल्पासाठीचे अनुदान राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) मधून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी संचालक (फलोत्पादन) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे. सदरचे अनुदान आरटीजीएस व्दारे बँक खात्यावर संबंधित विभाग, संस्था यांना कृषि आयुक्तालयाकडून वितरीत करण्यात येईल. प्राप्त अनुदानाचा वापर करताना विहित लेखाविषयक कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. प्रकल्पांतर्गत दरमहा झालेल्या खर्चाचा मासिक प्रगती सोबत दिलेल्या विहीत प्रपत्रात दरमहा दहा तारखेपर्यंत कृषि आयुक्तालयास सादर करण्यात यावा. तसेच **सदर प्रकल्प सर्वंकष जिल्हा कृति आराखडयात समाविष्ट करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.**

प्रकल्पांतर्गत कृषि विभागासाठीचे अनुदान आरटीजीएस व्दारे बँक खात्यावर संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना कृषि आयुक्तालयाकडून वितरीत करण्यात येईल. त्यांनी सदर अनुदान क्षेत्रिय पातळीवरील तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांचे स्तरावर त्यांचे संबंधीत बाबींनुसार पुढीलप्रमाणे उपलब्ध करुन द्यावे.

विभागीय स्तरावरील अनुदान संबंधित विभागाचे मुख्यालय असलेल्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्तरावर उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यांनी सदर अनुदान संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांना उपलब्ध करुन द्यावे.

| अ.क्र. | बाब | रक्कम वितरीत करावयाचा स्तर |
|---|---|---|
| १. | कीड सर्वेक्षकांचे वेतन, प्रवास भत्ता, सेवा पुरवठादार ठेकेदाराचे सेवा आकारासह रु. १०,७२०/- प्रति कीड सर्वेक्षक प्रति महिना याप्रमाणे | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| २. | संगणक प्रचालकांचे मानधन सेवा पुरवठादार ठेकेदाराचे सेवा आकारासह रु.८,८५०/- प्रति संगणक प्रचालक प्रति महिना याप्रमाणे | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| ३. | कृषि पर्यवेक्षकांच्या फिरस्तीकरीता मासिक भाडेतत्वावर वाहन उपलब्ध करुन घेणे. रु. २०,०००/-प्रति महिना प्रति कृषि पर्यवेक्षक याप्रमाणे | उपविभागीय कृषि अधिकारी |
| ४. | कीड सर्वेक्षण चमूसाठी आकस्मिक खर्च आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांकरीता रु. १०,०००/- प्रति चमू याप्रमाणे | उपविभागीय कृषि अधिकारी |
| ५. | विभागीय कृषि सहसंचालक यांचे कार्यालयात संगणक प्रणाली मदतनीस रु. १४,४५०/- प्रति महिना याप्रमाणे | विभागीय कृषि सहसंचालक |
| ६. | विभागीय कृषि सहसंचालक यांच्याकरीता आकस्मिक निधी रु. ५५,०००/- प्रति विभागीय कृषि सहसंचालक | विभागीय कृषि सहसंचालक |
| ७. | आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू पिकाकरीता ऑनलाईन ॲडव्हायजरी जंबो झेरॉक्स करुन प्रत्येक गावात प्रसिध्द करण्यासाठी प्रति तालुका रक्कम रू. ५,००० याप्रमाणे एकूण १२५ तालुक्यांसाठी | तालुका कृषि अधिकारी |
| ८. | मास्टर ट्रेनर्सचे कृषि विद्यापीठात प्रशिक्षण आयोजित करणे (४९ उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्ह्याचे प्रती १० कर्मचारी व जिल्ह्यांचे प्रतिनिधी एकुण ३४६ अधिकारी/कर्मचारी) यांच्याकरीता रु. १,०००/- प्रति प्रशिक्षणार्थी याप्रमाणे २ दिवस प्रशिक्षण | विभागीय कृषि सहसंचालक |
| ९. | कृषि विभागाच्या सर्व क्षेत्रिय कर्मचा-यांसाठी मास्टर ट्रेनर्स यांच्या सहाय्याने द्यावयाचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण रु. ५००/- प्रति कर्मचारी, २०० कर्मचारी प्रति जिल्ह्याप्रमाणे २६ जिल्ह्यांसाठी. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| १०. | कीड रोग सर्वेक्षण चमूसाठी कृषि विद्यापीठात प्रशिक्षण आयोजित करणे. रु. ७००/- प्रति प्रशिक्षणांर्थी याप्रमाणे | विभागीय कृषि सहसंचालक |
| ११. | आपत्कालिन परीस्थितीत जैविक/रासायनिक निविष्ठांचा ५० टक्के किंवा रु. ७५०/- प्रति हेक्टर याप्रमाणे पुरवठा करणे | विभागीय कृषि सहसंचालक |

**“प्रपत्र -अ”**

सन २०१६-१७ मध्ये तालुकानिहाय कीड सर्वेक्षणासाठी आवश्यक कीड सर्वेक्षक, कृषि पर्यवेक्षक व संगणक प्रचालक यांची संख्या निर्धारीत करण्यात आलेली आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे :

| अ.क्र | फळपिक | जिल्हा | किड सर्वेक्षक | संगणक प्रचालक | पेस्ट मॉनिटर (कृषि पर्यवेक्षक) |
|---|---|---|---|---|---|
| १ | आंबा | पालघर | ५ | १ | १ |
| २ | | रायगड | १२ | ४ | ४ |
| ३ | | रत्नागिरी | २७ | ३ | ३ |
| ४ | | सिंधूदुर्ग | १३ | २ | २ |
| ५ | | बीड | ३ | १ | १ |
| ६ | | उस्मानाबाद | ६ | २ | २ |
| ७ | | औरंगाबाद | २ | १ | १ |
| **एकूण** | | | **६८** | **१४** | **१४** |
| ८ | डाळींब | अहमदनगर | १४ | ४ | ४ |
| ९ | | सोलापूर | १२ | ३ | ३ |
| १० | | पुणे | ५ | २ | २ |
| ११ | | सांगली | ५ | १ | १ |
| १२ | | सातारा | २ | १ | १ |
| १३ | | नाशिक | १४ | १ | १ |
| १४ | | धुळे | २ | १ | १ |
| १५ | | औरंगाबाद | ४ | २ | २ |
| **एकूण** | | | **५८** | **१५** | **१५** |
| १६ | केळी | जळगाव | ११ | २ | २ |
| १७ | | सोलापूर | ४ | २ | २ |
| १८ | | हिंगोली | २ | १ | १ |
| १९ | | अकोला | १ | १ | १ |
| २० | | नांदेड | ३ | १ | १ |
| **एकूण** | | | **२१** | **७** | **७** |
| २१ | संत्रा | अकोला | १ | १ | १ |
| २२ | | अमरावती | ३० | ३ | ३ |
| २३ | | बुलढाणा | १ | १ | १ |
| २४ | | वर्धा | २ | १ | १ |
| २५ | | नागपूर | १३ | २ | २ |
| **एकूण** | | | **४७** | **८** | **८** |
| २६ | मोसंबी | औरंगाबाद | ८ | २ | २ |
| २७ | | जालना | १२ | २ | २ |
| **एकूण** | | | **२०** | **४** | **४** |
| २८ | चिकू | पालघर | १ | १ | १ |
| **एकूण** | | | **१** | **१** | **१** |
| **एकंदर** | | | **२१५** | **४९** | **४९** |

## "प्रपत्र -ब"

# फलोत्पादन पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) २०१६-१७

## कामगार विभागाच्या दिनांक-०८/०८/२०१४ च्या अधिसुचनेनुसार हॉर्टसॅप प्रकल्पाअंतर्गत कंत्राटी मनुष्यबळाच्या निश्चित केलेल्या सुधारीत वेतनाचा तपशिल

| Sr. No. | Component | Per Month amount for various categories of workers | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **Pest Scout** | **Data Entry Operator** | **Software Supporter** | **Computer Operator** | **Accountant** |
| 1 | Monthly basic wages | 4680.00 | 4680.00 | 8100.00 | 5400.00 | 6750.00 |
| 2 | HRA 5% on monthly basic wages | 234.00 | 234.00 | 405.00 | 270.00 | 338.00 |
| 3 | Conveyance allowance (Travelling) | 1500.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 4 | Special allowance | 936.25 | 936.25 | 936.25 | 936.25 | 936.25 |
| | **Sub Total A (1+2+3+4)** | **7350.25** | **5850.25** | **9441.25** | **6606.25** | **8024.25** |
| 5 | Leave Encashment (21 leave in 12 months) i.e. Amount of 1.75 days per Month | 273.00 | 273.00 | 473.00 | 315.00 | 394.00 |
| 6 | Bonus @ 8.33 % on Monthly basic wages | 390.00 | 390.00 | 675.00 | 450.00 | 562.00 |
| | **Sub Total B(5+6)** | **663.00** | **663.00** | **1148.00** | **765.00** | **956.00** |
| | **Sub Total C (Sub Total A+B)** | **8013.25** | **7176.25** | **10589.25** | **7371.25** | **8980.25** |
| 7 | Service Charges of Man power Supplier @--% of Sub total C (Decided as per the Tender, Here Assumed as 5%) | | | | | |
| 8 | P.F. 13.61% of monthly basic wages | 637.00 | 637.00 | 1102.00 | 735.00 | 919.00 |
| 9 | ESI 4.75% of Sub Total A (wherever is applicable) | 350.00 | 278.00 | 449.00 | 314.00 | 382.00 |
| | **Sub Total D (Sub Total C+7+8+9)** | | | | | |
| 10 | Service Tax @ 14% on Sub Total D | | | | | |
| | **Grand Total (Sub Total D+10)** | | | | | |

**NOTE:**

| | |
|---|---|
| 1 | Difference in Minimum Wages and/or Special Allowance as declared by the Government along with other charges as mentioned above will be paid extra by the company after submission of the bill along with documents. |
| 2 | Bonus amount along with Service charges and Service Tax will be paid by the company at the time of Deepavali Festival after submission of the bill. |
| 3 | Leave Wages along with Service charges and Service Tax will paid by the company after submission of the bill. |

## सन २०१६-१७ करीता प्रकल्पातील विविध बाबीअंतर्गत निधीची आवश्यकता

प्रकल्पातील सहभागी संस्था, विभाग यांना बाबनिहाय लागणा-या अनुदानाची आवश्यकता व त्याचा तपशिल **(रक्कम रु. लाखात)**

| अ.क्र. | बाब | बानिहाय खर्चाचा तपशिल | लागणारे अनुदान | संस्था |
|---|---|---|---|---|
| **अ) कीड-रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन पद्धती** | | | | |
| १ | **संगणक प्रचालक (डेटा एंट्री ऑपरेटर)** | | | |
| | **डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू पिकांकरीता:-** रु. ८,८५०/- प्रती महिना मनुष्यबळाच्या सेवाकरीता मानधन ११ महिन्यांकरीता ३५ संगणक प्रचालक | कृषि पर्यवेक्षकाचे अधिनस्त संगणक प्रचालकाचे काम करणे | ३४.०७२५० | संबंधीत जिअकृअ |
| | **आंबा या पिकाकरीता :-** रु. ८,८५०/- प्रती महिना मनुष्यबळाच्या सेवाकरीता मानधन ७ महिन्यांकरीता १४ संगणक प्रचालक | | ८.६७३०० | |
| | **एकुण** | | ४२.७४५५० | |
| २ | **कीड सर्वेक्षक** | | | |
| | **डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू पिकांकरीता:-** रु. १०,७२०/- प्रती महिना मनुष्यबळाच्या सेवाकरीता मानधन ११ महिन्यांकरीता १४७ कीड सर्वेक्षक | वरीलप्रमाणे कृषि पर्यवेक्षकांचे अधिनस्त क्षेत्रिय पातळीवर सर्वेक्षणाचे व माहिती गोळा करण्याचे काम करणे | १७३.३४२४० | संबंधीत जिअकृअ |
| | **आंबा या पिकाकरीता :-** रु. १०,७२०/- प्रती महिना मनुष्यबळाच्या सेवाकरीता मानधन ७ महिन्यांकरीता ६८ कीड सर्वेक्षक | | ५१.०२७२० | |
| | **एकुण** | | २२४.३६९६० | |
| ३ | **कृषि पर्यवेक्षक** | | | |
| | **डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू पिकांकरीता:-** रु. २०,०००/- प्रती महिना फिरतीसाठी मासिक भाडे तत्वावर वाहन घेणे ११ महिन्यांकरीता ३५ कृषि पर्यवेक्षक | कीड सर्वेक्षकाच्या कामाचे नियंत्रण व रोवींग सर्व्हे करणे, कीडरोग पूर्व इतिहास पुस्तिका तयार करण्यासाठी फिरस्तीकरीता | ७७.०० | संबंधीत जिअकृअ |
| | **आंबा या पिकाकरीता :-** रु. २०,०००/- प्रती महिना फिरतीसाठी मासिक भाडे तत्वावर वाहन घेणे ७ महिन्यांकरीता १४ कृषि पर्यवेक्षक | | १९.६० | |
| | **एकुण** | | ९६.६० | |

| अ.क्र. | बाब | बानिहाय खर्चाचा तपशिल | लागणारे अनुदान | संस्था |
|---|---|---|---|---|
| ४ | **संशोधन सहयोगी**<br>**आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांकरीता :-**<br>**राज्य कृषि विभागासाठी - १,**<br>म.फु.कृ.वि. राहुरी, डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला, डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली, व.ना.म.कृ.वि. परभणी-**प्रती विद्यापीठ २** (किटकशास्त्र किंवा वनस्पती रोगशास्त्र-गरजेनुसार) **याप्रमाणे ८**<br>विभागीय संशोधन केंद्र, वेंगुर्ला-**१,**<br>राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर-**२,**<br>राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, त्रिची-**१,**<br>राष्ट्रीय लिंबुवर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूर-**१,**<br>कृषि संशोधन केंद्र, पालघर-**१**<br>केळी संशोधन केंद्र, जळगाव-**१**<br>**असे एकुण १६**<br>(पदव्युत्तर पदवीधारक उमेदवारास रु.३८,०००/- प्रति महिना अधिक घरभाडे अथवा पी.एचडी उमेदवारास रु.४०,०००/- प्रति महिना अधिक घरभाडे) नियमानुसार १२ महिन्यांसाठी | संशोधन सहयोगी (किटकशास्त्र / वनस्पती रोगशास्त्र) आयपीएम मोड्युल प्रसिद्धी साहीत्य तयार करणे व साप्ताहीक सल्ले प्रसारीत करणे | **८७.८४** | **१. राज्य कृषि विभाग**<br>**२. म.फु.कृ.वि. राहुरी**<br>**३. डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला**<br>**४. डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली**<br>**५. व.ना.म.कृ.वि. परभणी**<br>**६. विभागीय संशोधन केंद्र, वेंगुर्ला**<br>**७. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर**<br>**८. राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, त्रिची**<br>**९. राष्ट्रीय लिंबुवर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूर**<br>**१०. कृषि संशोधन केंद्र, पालघर**<br>**११. केळी संशोधन केंद्र, जळगाव** |
| ५ | **संशोधन सहयोगी (एसएमएस) : एनसीआयपीएम, नवी दिल्ली**<br>पदव्युत्तर पदवीधारक उमेदवारास रु.३८,०००/- प्रति महिना अधिक घरभाडे अथवा पी.एचडी उमेदवारास रु.४०,०००/- प्रति महिना अधिक घरभाडे नियमानुसार २ संशोधन सहयोगी १२ महिन्यांसाठी | संशोधन सहयोगी (किटकशास्त्र / वनस्पती रोगशास्त्र) आयपीएम मोड्युल प्रसिद्धी साहीत्य तयार करणे व साप्ताहीक सल्ले प्रसारीत करणे | **११.७१२००** | **एनसीआयपीएम, नवी दिल्ली** |
| ६ | **संगणक प्रचालक (कंप्युटर ऑपरेटर)** | | | |
| | **राज्य कृषि विभाग :-**<br>रु. १०,०२०/- प्रति महिना मनुष्यबळाच्या सेवाकरीता मानधन ११ महिन्यांकरीता २ संगणक प्रचालक | कीडरोग व हवामान आधारीत माहिती संकलीत करणे व विश्लेषण करणे | **२.२०४४०** | **राज्य कृषि विभाग** |
| | **४ कृषि विद्यापीठे व आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू संशोधन केंद्र यांकरीता :-**<br>रु. ८,८५०/- प्रती महिना मनुष्यबळाच्या सेवाकरीता मानधन ११ | हवामानावर आधारीत माहिती संकलीत करणे व विश्लेषण करणे | **९.७३५००** | **१. म.फु.कृ.वि. राहुरी**<br>**२. डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला**<br>**३. डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली** |

| अ.क्र. | बाब | बानिहाय खर्चाचा तपशिल | लागणारे अनुदान | संस्था |
|---|---|---|---|---|
| | महिन्यांकरीता प्रति विद्यापीठ व संशोधन केंद्र १ संगणक प्रचालक प्रमाणे एकुण १० संगणक प्रचालक | | | ४. **व.ना.म.कृ.वि. परभणी**<br>५. **विभागीय संशोधन केंद्र, वेंगुर्ला**<br>६. **राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर**<br>७. **राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, त्रिची**<br>८. **राष्ट्रीय लिंबुवर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूर**<br>९. **कृषि संशोधन केंद्र, पालघर**<br>१०. **केळी संशोधन केंद्र, जळगाव** |
| ७ | **लेखापाल-राज्य कृषि विभाग**<br>रु. १२,२५०/- प्रती महिना ११ महिन्यांकरीता १ लेखापाल | लेखाविषयक कामकाज करणे | **१.३४७५०** | **राज्य कृषि विभाग** |
| ८ | **संगणक प्रणाली मदतनीस**<br>विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे, नाशिक, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर प्रती १ याप्रमाणे एकुण ८ रु. १४,४५०/- प्रती महिना प्रमाणे ११ महिन्यांसाठी | कीड नियंत्रकांकडील लॅपटॉप संबंधी अडचणी सोडविण्याकरीता विभागीय स्तरावर नेमणुक करणे | **१२.७१६००** | **विकृससं सर्व** |
| ९ | **वाहतुक व प्रवास भत्ता** | | | |
| | **राज्य कृषि विभाग -रु. १.५० लाख** | निश्चित प्लॉट सर्व्हे व रोव्हिंग प्लॉटचे रँडमली भेट देवून निरिक्षणे तपासणे, बैठकांसाठी उपस्थित राहणे | **१.५०** | **राज्य कृषि विभाग** |
| | **एनसीआयपीएम, नवी दिल्ली- रु. २.०० लाख** | | **२.००** | **एनसीआयपीएम, नवी दिल्ली** |
| | **प्रती रु. १.०० लाख प्रमाणे ४ कृषि विद्यापीठे**<br>(म.फु.कृ.वि. राहुरी /डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला/डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली/ व.ना.म.कृ.वि. परभणी) | | **४.००** | १. **म.फु.कृ.वि. राहुरी**<br>२. **डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला**<br>३. **डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली**<br>४. **व.ना.म.कृ.वि. परभणी** |
| | **प्रती रु. १.०० लाख प्रमाणे ६ संशोधन केंद्र**<br>(आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू) | | **६.००** | १. **विभागीय संशोधन केंद्र, वेंगुर्ला**<br>२. **राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर** |

| अ.क्र. | बाब | बानिहाय खर्चाचा तपशिल | लागणारे अनुदान | संस्था |
|---|---|---|---|---|
| | | | | ३. केळी संशोधन केंद्र, जळगाव<br>४. राष्ट्रीय लिंबुवर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूर<br>५. कृषि संशोधन केंद्र, पालघर |
| | **प्रति रु. १.०० लाख प्रमाणे राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, त्रिची** | | १.०० | **राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, त्रिची** |
| १० | **आकस्मिक निधी** | | | |
| | **राज्य कृषि विभाग -रु. १.०० लाख** | कार्यक्रमांतर्गत प्रायोगिक साहित्य खरेदी, स्टेशनरी आणि संकीर्ण खर्च, पोस्टेल चार्जेस, फॅक्स इत्यादी साहित्य विकसीत करणे, विडीओ फिल्म तयार करणे | १.०० | **राज्य कृषि विभाग** |
| | **एनसीआयपीएम, नवी दिल्ली- रु. १.०० लाख** | | १.०० | **एनसीआयपीएम, नवी दिल्ली** |
| | **प्रति रु. ०.५० लाख प्रमाणे ४ कृषि विद्यापीठे**<br>म.फु.कृ.वि. राहुरी /डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला/डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली/ व.ना.म.कृ.वि. परभणी | | २.०० | **१. म.फु.कृ.वि. राहुरी<br>२. डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला<br>३. डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली<br>४. व.ना.म.कृ.वि. परभणी** |
| | **प्रति रु. ०.५० लाख प्रमाणे ६ संशोधन केंद्र**<br>आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू | | ३.०० | **१. विभागीय संशोधन केंद्र, वेंगुर्ला<br>२. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर<br>३. केळी संशोधन केंद्र, जळगाव<br>४. राष्ट्रीय लिंबुवर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूर<br>५. कृषि संशोधन केंद्र, पालघर<br>६. केळी संशोधन केंद्र, त्रिची** |
| ११ | **विभागीय कृषि सहसंचालक यांचेसाठी आकस्मिक निधी :**<br>(रु. ०.५५ लाख प्रति विकृससं) | आकस्मिक खर्चासाठी साहित्य, स्टेशनरी, फॅक्स, दुरध्वनी, व्हिडीओक्लिप्स, प्रचार साहित्य इ. साठी | ४.४० | **विकृससं सर्व** |

| अ.क्र. | बाब | बानिहाय खर्चाचा तपशिल | लागणारे अनुदान | संस्था |
|---|---|---|---|---|
| १२ | **कृषि विद्यापीठ/कृषि विज्ञान केंद्र यांच्या प्रतिनिधींसाठी आकस्मिक व प्रवासभत्ता :** रु. १५,०००/- प्रति जिल्हा या प्रमाणे २३ जिल्ह्यांकरीता | सर्वेक्षण चमुसाठी व प्रशिक्षणासाठी | ३.४५ | संबंधीत जिअकृअ |
| १३ | **तालुका कृषि अधिका-यांसाठी प्रत्येक गावासाठी कीड रोग व्यवस्थापन ॲडव्हायझरी प्रसिध्दीबाबत** प्रति तालुका रु. ५,०००/- प्रमाणे १२५ तालुक्यांसाठी एकुण ४४ आठवड्यांकरीता | ऑनलाईन ॲडव्हाय -झरी तयार करणे व त्याच्या जम्बो झेरॉक्स प्रति करुन गावातील वार्ता फलकावर लावणे | ६.२५ | संबंधीत जिअकृअ |
| १४ | **आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू पिकांकरीता डाटा भरण्यासाठी सर्वेक्षण प्रपत्रे छपाई करणे व वितरीत करणे** (रु. २.०० प्रति प्रपत्रप्रमाणे) | २१५ कीड सर्वेक्षक व ४९ कृषि पर्यवेक्षक करीता ६२ प्रपत्रे प्रति आठवडा ४४ आठवड्यांकरीता एकुण ७२०१९२ प्रपत्रांसाठी प्रपत्र छपाई व वितरण करणे. | १४.४०३८४ | विकृससं, सर्व |
| १५ | **सर्वेक्षण किट** **आंबा या पिकाकरीता** सर्वेक्षण कीट १ कीड सर्वेक्षकाकरीता (२ प्लॉटसाठी ८ फ्रुट फ्लॉय ट्रॅप्स व ३२ ल्युअर्स) | सापळे लावणे | २.०० | डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली |
| १६ | **आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, चिक्कू या पिकांसाठी सर्वेक्षण कीट करीता आकस्मिक खर्च** रु. १०,०००/- प्रति कीड सर्वेक्षण चमु याप्रमाणे एकुण ४९ चमुंसाठी | सर्वेक्षण किट (भिंग, किटक जमा करण्याच्या डब्या, निडल) सीडी, स्टेशनरी खरेदीसाठी, इंटरनेट कनेक्शनचे मासिक भाडे, सायबर कॅफे, इत्यादीसाठी | ४.९० | संबंधीत जिअकृअ |
| १७ | **ऑनलाईन एसएमएस आवर्ती खर्च** | एसएमएस सेवेचे व्यवस्थापन करण्याकरीता | २.३६ | कृषि विभाग |
| | **एकुण (अ)** | | **५५४.३८९८४** | |
| **ब) कीड रोग सर्वेक्षण व शेतकरी जागृती कार्यक्रम** | | | | |
| १८ | **किड रोग सर्वेक्षण व सल्ला चमुंसाठी कृषि विद्यापीठात प्रशिक्षण :** रु.७००/- प्रति प्रशिक्षणार्थी याप्रमाणे २१५ कीड सर्वेक्षक, ४९ संगणक | कीड रोग सर्वेक्षणाबाबतची ऑनलाईन माहिती भरणे व कीड रोग | २.१९१ | १. म.फु.कृ.वि. राहुरी<br>२. डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला<br>३. डॉ.बा.सा.को.कृ.वि. |

| अ.क्र. | बाब | बानिहाय खर्चाचा तपशिल | लागणारे अनुदान | संस्था |
|---|---|---|---|---|
| | प्रचालक व ४९ कृषि पर्यवेक्षक करीता (एकुण ३१३)<br><br>(हंगाम सुरु होण्यापुर्वी २ दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करणे) | औळख व सर्वेक्षण याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करणे | | **दापोली**<br>**४. व.ना.म.कृ.वि. परभणी**<br>**५. केळी संशोधन केंद्र, जळगाव**<br>**६. कृषि संशोधन केंद्र, पालघर** |
| १९ | **मास्टर ट्रेनर प्रशिक्षण :**<br>आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, चिक्कू या पिकांकरीता ४९ उपविभागीय कृषि अधिकारी, प्रती जिल्हा १० कर्मचारी व २३ जिल्ह्यांचे प्रतिनिधी (एकुण ३४६) रु. १०००/- प्रति कर्मचारीप्रमाणे २ दिवसाचे प्रशिक्षण | आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी व चिक्कू या पिकांसाठी मास्टर ट्रेनर्स व आयपीएम मॉड्युल तयार करण्यासाठी प्रशिक्षणद्य | ३.४६ | **१. म.फु.कृ.वि. राहुरी**<br>**२. डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला**<br>**३. डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली**<br>**४. व.ना.म.कृ.वि. परभणी**<br>**५. केळी संशोधन केंद्र, जळगाव**<br>**६. कृषि संशोधन केंद्र, पालघर** |
| २० | **कृषि विभागाच्या कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण :**<br>रु. ५००/- प्रति कर्मचारी, २०० कर्मचारी प्रति जिल्ह्याप्रमाणे २३ जिल्ह्यांकरीता | क्षेत्रिय कर्मचा-यांसाठी मास्टर ट्रेनरने आयोजित केलेले प्रशिक्षण | २३.०० | **संबंधीत जिअकृअ** |
| २१ | **प्रचार व प्रसिध्दी साहित्य :**<br>पोस्टर्स, घडीपत्रिका इतर इलेक्ट्रॉनिक मिडीया, वृत्तपत्रे रु. ०.५० लाख प्रति जिल्हा २३ जिल्ह्यांसाठी | जनजागृती | ११.५० | **संबंधीत जिअकृअ** |
| २२ | **वरील सर्व कार्यक्रमांचे समन्वयन :**<br>(राज्यस्तरीय सर्वेक्षण चमुसाठी इंटरनेट सुविधा, स्टेशनरी, कार्यालयीन सुविधा, संगणक, प्रिंटर इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करणे) | नियमित बैठकांचे आयोजन करणे | ४.०० | **राज्य कृषि विभाग** |
| | **एकुण (ब)** | | **४४.१५१००** | |
| **क) पीक संरक्षण औषधांचा पुरवठा करणे** | | | | |
| २३ | **आपत्कालिन परिस्थितीत जैविक/ रासायनिक निविष्ठांचा ५० टक्के किंवा रु. ७५०/- प्रति हेक्टरप्रमाणे पुरवठा करणे**<br>**(प्रति विभागनिहाय मागणीनुसार)** | गरजेनुसार आकस्मिक उद्‌भवणारा कीड रोगाच्या नियंत्रणासाठी औषध पुरवठा | ६५.२२९१६ | **विकृससं सर्व** |
| | **एकुण (क)** | | **६५.२२९१६** | |

| अ.क्र. | बाब | बानिहाय खर्चाचा तपशिल | लागणारे अनुदान | संस्था |
|---|---|---|---|---|
| **ड) आयटी सुविधा** | | | | |
| २४ | **ऑनलाईन माहिती भरण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संगणक प्रणालीमध्ये नवीन बाबींचा अंतर्भाव करणे तसेच आवश्यकतेनुसार सुधारणा करणे व त्याचे व्यवस्थापन करणे**<br>(संगणक, लॅपटॉप, प्रिंटर व त्याचेशी संलग्न माहिती तंत्रज्ञान उपकरणासह) | ऑनलाईन सर्वेक्षण अहवालाची नोंद करणे, डाटा भरल्याची खात्री करणे. कीड रोग परिस्थितीची माहिती तयार करणे, ॲडव्हायझरी देणे | ५.०० | एनसीआयपीएम, नवी दिल्ली |
| | **एकुण (ड)** | | **५.००** | |
| | **एकुण एकंदर (अ+ब+क+ड)** | | **६८८.७७** | |

**प्रकल्पासाठी लागणारी एकुण रक्कम**

| अ.क्र. | बाब | रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|
| अ) | **कीड-रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन पद्धती** | ५५४.३९ |
| ब) | **कीड रोग सर्वेक्षण व शेतकरी जागृती कार्यक्रम** | ४४.१५ |
| क) | **पीक संरक्षण औषधांचा पुरवठा करणे** | ६५.२३ |
| ड) | **आयटी सुविधा** | ५.०० |
| | **एकुण** | **६६८.७७** |

## फलोत्पादन पिकावरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) २०१६-१७

| अ.क्र. | जिल्हा/विभाग | प्रकल्प संख्या | | संगणक प्रचालक वेतन (प्रति महिना रु. ८८५०/- प्रमाणे) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आंबा पिकावरीता (७ महिने) | | | | | डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, चिक्कू (११ महिने) | | | | |
| | | | | भौतिक (कर्मचारी संख्या) | | आर्थिक | | | भौतिक (कर्मचारी संख्या) | | आर्थिक | | |
| | | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | वितरीत | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | वितरीत | साध्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | पालघर | | | १ | | ६१९५० | | | १ | | ९७३५० | | |
| ३ | रायगड | | | ४ | | २४७८०० | | | ० | | ० | | |
| ४ | रत्नागिरी | | | ३ | | १८५८५० | | | ० | | ० | | |
| ५ | सिंधुदुर्ग | | | २ | | १२३९०० | | | ० | | ० | | |
| | विकृससं, ठाणे | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण ठाणे** | | | | **१०** | | **६१९५००** | | | **१** | | **९७३५०** | | |
| ६ | नाशिक | | | ० | | ० | | | १ | | ९७३५० | | |
| ७ | धुळे | | | ० | | ० | | | १ | | ९७३५० | | |
| ८ | जळगाव | | | ० | | ० | | | २ | | १९४७०० | | |
| | विकृससं, नाशिक | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण नाशिक** | | | | **०** | | **०** | | | **४** | | **३८९४००** | | |
| ९ | पुणे | | | ० | | ० | | | २ | | १९४७०० | | |
| १० | अहमदनगर | | | ० | | ० | | | ४ | | ३८९४०० | | |
| ११ | सोलापूर | | | ० | | ० | | | ५ | | ४८६७५० | | |
| | विकृससं, पुणे | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण पुणे** | | | | **०** | | **०** | | | **११** | | **१०७०८५०** | | |
| १२ | सातारा | | | ० | | ० | | | १ | | ९७३५० | | |
| १३ | सांगली | | | ० | | ० | | | १ | | ९७३५० | | |
| | विकृससं, कोल्हापूर | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण कोल्हापूर** | | | | **०** | | **०** | | | **२** | | **१९४७००** | | |
| १५ | औरंगाबाद | | | १ | | ६१९५० | | | ४ | | ३८९४०० | | |
| १६ | जालना | | | ० | | ० | | | २ | | १९४७०० | | |
| १७ | बीड | | | १ | | ६१९५० | | | ० | | ० | | |
| | विकृससं, औरंगाबाद | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण औरंगाबाद** | | | | **२** | | **१२३९००** | | | **६** | | **५८४१००** | | |
| १८ | उस्मानाबाद | | | २ | | १२३९०० | | | ० | | ० | | |
| १९ | हिंगोली | | | ० | | ० | | | १ | | ९७३५० | | |
| २० | नांदेड | | | | | | | | १ | | ९७३५० | | |
| | विकृससं, लातूर | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण लातूर** | | | | **२** | | **१२३९००** | | | **२** | | **१९४७००** | | |
| २१ | बुलढाणा | | | ० | | ० | | | १ | | ९७३५० | | |
| २२ | अकोला | | | ० | | ० | | | २ | | १९४७०० | | |
| २३ | अमरावती | | | ० | | ० | | | ३ | | २९२०५० | | |
| | विकृससं, अमरावती | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण अमरावती** | | | | **०** | | **०** | | | **६** | | **५८४१००** | | |
| २४ | वर्धा | | | ० | | ० | | | १ | | ९७३५० | | |
| २५ | नागपूर | | | ० | | ० | | | २ | | १९४७०० | | |
| | विकृससं, नागपूर | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण नागपूर** | | | | **०** | | **०** | | | **३** | | **२९२०५०** | | |
| **एकुण (विभाग)** | | | | **१४** | | **८६७३००** | | | **३५** | | **३४०७२५०** | | |

## फलोत्पादन पिकावरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) २०१६-१७

| अ.क्र. | जिल्हा/विभाग | प्रकल्प संख्या | | कीड सर्वेक्षक वेतन (प्रति महिना रु. १०७२०/- प्रमाणे) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आंबा पिकावरीता (७ महिने) | | | | | डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, चिक्कू (११ महिने) | | | | |
| | | | | भौतिक (कर्मचारी संख्या) | | आर्थिक | | | भौतिक (कर्मचारी संख्या) | | आर्थिक | | |
| | | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | वितरीत | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | वितरीत | साध्य |
| १ | २ | ३ | ४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| १ | पालघर | | | ५ | | ३७५२०० | | | १ | | ११७९२० | | |
| ३ | रायगड | | | १२ | | ९००४८० | | | ० | | ० | | |
| ४ | रत्नागिरी | | | २७ | | २०२६०८० | | | ० | | ० | | |
| ५ | सिंधुदुर्ग | | | १३ | | ९७५५२० | | | ० | | ० | | |
| | विकृससं, ठाणे | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण ठाणे** | | | | **५७** | | **४२७७२८०** | | | **१** | | **११७९२०** | | |
| ६ | नाशिक | | | ० | | ० | | | १४ | | १६५०८८० | | |
| ७ | धुळे | | | ० | | ० | | | २ | | २३५८४० | | |
| ८ | जळगाव | | | ० | | ० | | | ११ | | १२९७१२० | | |
| | विकृससं, नाशिक | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण नाशिक** | | | | **०** | | **०** | | | **२७** | | **३१८३८४०** | | |
| ९ | पुणे | | | ० | | ० | | | ५ | | ५८९६०० | | |
| १० | अहमदनगर | | | ० | | ० | | | १४ | | १६५०८८० | | |
| ११ | सोलापूर | | | ० | | ० | | | १६ | | १८८६७२० | | |
| | विकृससं, पुणे | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण पुणे** | | | | **०** | | **०** | | | **३५** | | **४१२७२००** | | |
| १२ | सातारा | | | ० | | ० | | | २ | | २३५८४० | | |
| १३ | सांगली | | | ० | | ० | | | ५ | | ५८९६०० | | |
| | विकृससं, कोल्हापूर | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण कोल्हापूर** | | | | **०** | | **०** | | | **७** | | **८२५४४०** | | |
| १५ | औरंगाबाद | | | २ | | १५००८० | | | १२ | | १४१५०४० | | |
| १६ | जालना | | | ० | | ० | | | १२ | | १४१५०४० | | |
| १७ | बीड | | | ३ | | २२५१२० | | | ० | | ० | | |
| | विकृससं, औरंगाबाद | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण औरंगाबाद** | | | | **५** | | **३७५२००** | | | **२४** | | **२८३००८०** | | |
| १८ | उस्मानाबाद | | | ६ | | ४५०२४० | | | ० | | ० | | |
| १९ | हिंगोली | | | ० | | ० | | | २ | | २३५८४० | | |
| २० | नांदेड | | | | | ० | | | ३ | | ३५३७६० | | |
| | विकृससं, लातूर | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण लातूर** | | | | **६** | | **४५०२४०** | | | **५** | | **५८९६००** | | |
| २१ | बुलढाणा | | | ० | | ० | | | १ | | ११७९२० | | |
| २२ | अकोला | | | ० | | ० | | | २ | | २३५८४० | | |
| २३ | अमरावती | | | ० | | ० | | | ३० | | ३५३७६०० | | |
| | विकृससं, अमरावती | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण अमरावती** | | | | **०** | | **०** | | | **३३** | | **३८९१३६०** | | |
| २४ | वर्धा | | | ० | | ० | | | २ | | २३५८४० | | |
| २५ | नागपूर | | | ० | | ० | | | १३ | | १५३२९६० | | |
| | विकृससं, नागपूर | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण नागपूर** | | | | **०** | | **०** | | | **१५** | | **१७६८८००** | | |
| **एकुण (विभाग)** | | | | **६८** | | **५१०२७२०** | | | **१४७** | | **१७३३४२४०** | | |

## फलोत्पादन पिकावरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) २०१६-१७

| अ.क्र. | जिल्हा/विभाग | प्रकल्प संख्या | | कृषि पर्यवेक्षक फिरतीसाठी भाडे तत्वावर वाहन घेणे (प्रति महिना रु. २००००/- प्रमाणे) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आंबा पिकावरीता (७ महिने) | | | | | डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, चिक्कू (११ महिने) | | | | |
| | | | | भौतिक (कर्मचारी संख्या) | | आर्थिक | | | भौतिक (कर्मचारी संख्या) | | आर्थिक | | |
| | | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | वितरीत | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | वितरीत | साध्य |
| १ | २ | ३ | ४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ |
| १ | पालघर | | | १ | | १४०००० | | | १ | | २२०००० | | |
| ३ | रायगड | | | ४ | | ५६०००० | | | ० | | ० | | |
| ४ | रत्नागिरी | | | ३ | | ४२०००० | | | ० | | ० | | |
| ५ | सिंधुदुर्ग | | | २ | | २८०००० | | | ० | | ० | | |
| | विकृससं, ठाणे | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण ठाणे** | | | | **१०** | | **१४०००००** | | | **१** | | **२२००००** | | |
| ६ | नाशिक | | | ० | | ० | | | १ | | २२०००० | | |
| ७ | धुळे | | | ० | | ० | | | १ | | २२०००० | | |
| ८ | जळगाव | | | ० | | ० | | | २ | | ४४०००० | | |
| | विकृससं, नाशिक | | | ० | | ० | | | ० | | ० | | |
| **एकुण नाशिक** | | | | **०** | | **०** | | | **४** | | **८८००००** | | |
| ९ | पुणे | | | ० | | ० | | | २ | | ४४०००० | | |
